
ebook
आठवणी
'दूरदर्शन'च्या
लेखक -डॉ. अनंत पावसकर

‘ई-साहित्य प्रतिष्ठान’

सादर करीत आहे.

डॉ. अनंत पावसकर

लिखित

# आठवणी.. ‘दूरदर्शनच्या’




© - डॉ. अनंत पावसकर (ज्येष्ठ पत्रकार आणि संगीत संयोजक)

anantpavaskar@gmail.com ९८२००२२४१७


हजारो दर्जेदार मराठी ई-पुस्तके!

फक्त ’एकच’ क्लिक ..... आणि ई-पुस्तक हजर

**For all ‘E-Sahitya’ E-Books.. Visit/Log on**

**https://www.esahity.com**

**(पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर एक क्लिक करा- एक मिनिट थांबा बस्स)**

**तुमच्या आवडीची पन्नास पुस्तके डाऊनलोड करून मोबाईलवर ठेवा.**

## ♥ लेखकाविषयी थोडेसे : ♥

**डॉ. अनंत पावसकर,** (ज्येष्ठ सिने पत्रकार आणि माजी ध्वनिमुद्रण अधिकारी) (जन्म. १२ नोव्हेंबर १९५९ मुंबई)

डॉ. अनंत पावसकर, हे खऱ्या अर्थाने हिंदी-मराठी गाण्यांमध्ये आकंठ बुडालेले व्यक्तिमत्त्व. ज्यावेळी एखाद्या गाण्याचे, त्याच्या शब्दसुरांचे, संगीताचे, गायकीचे, गाण्याच्या पार्श्वभूमीचे, ध्वनिमुद्रणाचे, गायक-गायिकांच्या व्यक्तिमत्त्वाचे त्यांना भावलेले सौंदर्य ते उलगडून दाखवतात त्यावेळी त्या गाण्यात दडलेल्या सौंदर्याच्या अनुभूतीचा आस्वाद रसिकांनाही नव्याने भावतो. १९९४ ते २०००.. प्रत्येक शनिवारी (सलग सात वर्षे) दै. सामनाच्या फुलोरा पुरवणीमधील आठवणीतली गाणी या लोकप्रिय सदरामुळे वाचकांच्या परिचयाचं एक नाव. आज दिनांक, साप्ताहिक श्री, वृत्तमानस, लोकप्रभा, उत्सव पुरवणी अशा अनेक वृत्तपत्रे, साप्ताहिकात संगीत विषयक लिखाण करणारे अनंत पावसकर हे व्हीनस या मातब्बर म्युझिक कंपनीत अनेक वर्षे ध्वनिमुद्रण अधिकारी म्हणून कार्यरत होते. या काळात कंपनीतर्फे व कंपनीच्या शेकडो अल्बममध्ये त्यांचा पर्यवेक्षक म्हणून सहभाग राहीला आहे. कंपनीच्या अद्ययावत स्टुडिओत विविध निर्मात्यांच्या व संगीतकारांच्या शेकडो हिंदी चित्रपटाची गाणी, पार्श्वसंगीत होताना पाहायचं भाग्य लाभलं, परिचय झाला हे विशेष! ज्येष्ठ वादक, संयोजक यांच्यासोबत गप्पाच्या ओघात एकेक गाण्याची आठवण दृग्गोचर होऊ लागताच यातूनच ते आठवणीतली गाणी हे सदर लिहायला उद्युक्त झाले. (बाळासाहेब ठाकरे यांच्या निवासस्थानी पुस्तकांचे प्रकाशन झाले व अनेक वृत्तवाहिन्यांनी त्याची दखल घेतली होती.) आपल्या कव्हर स्टोरींसाठी ते ज्येष्ठ गायक, गायिका यांना प्रत्यक्ष भेटून मुलाखती घेत असत.

सुमारे चौदा वर्षे संगीतक्षेत्रापासून दूर असणा-या सुमनताई कल्याणपूर यांची मुलाखत घेत "ते सूर ऐकता" (संगीत : शांक-नील) द्वारे त्यांना संगीत क्षेत्रात पुन्हा एकदा लाईम-लाईट मध्ये आणण्याचं श्रेय त्यांच्याकडे जातं. (कवि प्रा. प्रवीण दवणे यांच्याकडे खूप आठवणी आहेत).

इतर अनेक दिवाळी अंकात संगीतविषयक लिखाण करताना, ऑडिओ कॅसेट स्वरूपातही दिवाळी अंक असावा.. ही संकल्पना "गुलमोहर" नावाने प्रत्यक्षात आली. (निवेदन प्रदीपजी भिडे). व्हीनसतर्फे अनेक मराठी नाटके प्रथम व्हीसीडीवर आणण्याचं श्रेय डॉ. अनंत पावसकरांकडे जातं. यात विजय कदम, विनय लाड, सविता मालपेकर, प्रशांत दामले या बालमित्रांची विशेष मदत झाली होती. साईबाबांच्या शिर्डीत १९९९ पासून २००७ पर्यंत ऑडिओ, व्हिडिओ असे सुमारे २५० अल्बम्स बनविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. हे अल्बम आजही सुप्रसिद्ध आहेत.

मराठीतील पहिलं "ई-बुक" बनविण्याचा मान त्यांच्याकडे जातो. यासाठी त्यांना ज्येष्ठ साहित्यिक शिरीष कणेकरजी यांच्या उपस्थितीत "आशीर्वाद" पुरस्काराने गौरविण्यात आले होते. तसेच नुकतेच त्यांना आंतरराष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. "डॉक्टरेट" सुद्धा मिळाली! आज त्यांची आठवणीतली गाणी, आपली आवड, लिजेंडस् ७७७७, कराओके क्लब या सह इतर अनेक ई-बुक्स "ई- साहित्य" तर्फे सध्या सर्वत्र व्हायरल होत आहेत हे विशेष. आज आपल्या समाधानी निवृत्त जीवनात ते "म्युझिक प्लॅनेट" ही स्वतःची संगीत अकादमी समर्थपणे सांभाळत आहेत. आपल्या सारखाच एक सर्वसामान्य रसिक, आपल्या संगीताचं वेड लेखनातून तसेच विविध संकल्पना राबवून लोकांपुढे आणायची सतत धडपड करतो म्हणून हा उल्लेख.

डॉ. अनंत पावसकर यांना हार्दिक शुभेच्छा.

(#संजीव_वेलणकर पुणे. - ९४२२३०१७३३)

♥




टीव्हीकडे नुसतं पाहिलं की त्याचे सुरूवातीचे दिवस आठवतात! 'कृष्ण-धवल' टीव्ही-संच असलेल्या, 'दूरदर्शन' काळातल्या त्या आठवणी असल्या, तरी त्यांनी आमचं आयुष्य 'सप्तरंगी' केलं होतं हे विसरून कसं चालेल! यातल्या आठवणी कुणा एकट्याच्याच नाहीत. असंच काहीसं तुमच्या भोवतीही घडलंय.. बिघडलंय..! टीव्हीकडे पाहताच आजही भूतकाळ आणि वर्तमानकाळातली ती रेषा पूसट होते. आठवणींचं मोहोळ उठतं! टीव्हीच्या आठवणींची ही दास्तान! तुमची.. आमची.. सर्वांचीच! या 'ई- बुक' मध्ये दिलेल्या 'लिंक्स' वर 'क्लिक' करून आनंद घ्या!



वरच्या ‘फोटो’ वर ‘क्लिक’ करून.. ती ‘धून’ नक्की ऐका! कारण.. ही ‘टिपिकल धून’, आज ज्येष्ठ नागरीक असलेल्या सर्वांसाठीच एक ‘आठवणींचा खजिना’ आहे! तुम्हां तरूणांना आपलेपणाने सांगायचं तर.. जेव्हा ‘टी.व्ही’ आले ना!.. तेव्हां आम्ही खूपच लहान होतो! लक्षात घ्या, या प्रकारच्या आठवणी ‘गुगलबाई’ किंवा ‘इंटरनेट’ वर उपलब्ध नाहीत. (का? कारण हे ‘गुगल सर्च इंजिन’ अस्तित्वात आले, तेच मुळी शुक्रवार दि. ४ सप्टेंबर, १९९८ या दिवशी..) आमचा जन्म १९६० दरम्यानचा! मी ज्या आठवणी आपलेपणाने उधृत करतोय त्या नक्की वाचा! अभ्यासा! मित्रांनो.. या आठवणी प्रकर्षाने कधी जाणवल्या माहीत्येय? एक खरीखूरी घडलेली, जिव्हारी लागलेली एक घटना, या क्षणी आठवतेय! ती सांगतंच या ‘ई-बुक’ ची सुरूवात करतोय!.. मनापासून वाचा! कारण यात सर्वच मानवी भावभावनांचा लपंडाव दडलाय! १९८५ दरम्यान मी ‘विरार’ या दूर उपनगरात रहायला गेलो! कारण आमच्या दक्षिण मुंबईतील ‘मुंबई सेंट्रल’ विभागात, टोकाचं असं ‘गॅंगवॉर’ भडकलेलं! तो अमुक काळ खरोखरच कठीण झाला होता! आम्ही तिथून गाशा गुंडाळला! लोक ‘पिकनिकला’ सुद्धा जायला, दहादा विचार करतात, अशा दूर ठिकाणी अगदी मजबुरीनेच रहायला गेलो.

मला तो दिवस अगदी कालच घडल्यागत आठवतोय! त्या दिवशी नेहमीप्रमाणेच प्लॅटफॉर्मवर तुफान रश होती. तर.. सदर ट्रेन फलाटाला लागायचा अवकाश, मी नेहमीप्रमाणे उडी मारून नेहमीची जागा पकडली. हुश्श!!.. नंतर

काय! ते नेहमीचे चेहरे! मग काय बोलू यार! आमचं हाय-हॅल्लो झालं! पेपरांची देवाणघेवाण झाली. आमच्या ग्रुपमधल्या कुणी.. पेपरात तोंड खुपसलं, काही जण गप्पा मारू लागले! 'नालासोपारा' वरून 'रिटर्न' आलेले.. मस्त 'रिलॅक्स' होते! त्यातील अनेकांनी तर चक्क पत्त्यांचा डाव मांडलेला! मी आजु बाजूला कुणी नवं आहे का? हे सहजंच पाहिलं.. आमच्या 'रेग्युलर' अशा 'ग्रुपमध्ये' एक अनाहूत पाहूणा होता. माझ्या कपाळावर् आपसुकच आठया पडल्या! 'कोण हा महाभाग?'! माझ्या समोरच तो एक वयस्कर इसम जाड भिंगाचा चष्मा लाऊन पेपर वाचत होता. डबा एव्हाना खचाखच भरलेला! गाडी सुरु झाली! 'सद्गुरू साईनाथ महाराज की.. जय!..' असा नेहमीप्रमाणे जयघोष झाला. ट्रेनमध्ये 'भजन' गाणाऱ्या ग्रुपने आपली मैफल सुरु केली. बोरीवली जाताच मात्र सर्वच थोडेसे रिलॅक्स झाले. उभ्या प्रवाश्यांची भिंत हटली! मोकळा श्वास घेता घेता आता गप्पांना सुरुवात झाली. त्या आजोबांच्या बोलण्याची स्टाईल ओळखीची वाटली. अगदी चिरपरिचित! मुंबईतल्या चाळीतला उल्लेख येताच ट्यूब पेटली, येस! अरे! हा तर आपला नंदूदादा! माझ्यापेक्षा भले सुमारे पंधरा वर्षांनी मोठा, त्याला आम्ही दादा म्हणायचो. अरे-तुरेच करायचो! आता मात्र तो छान आजोबा वाटत होता. मी विचारलं, 'तू.. तुमचं नाव नंदकुमार..?' आजोबा तिनताड उडाले.. 'तू.. तुम्ही.. सॉरी.. आठवत नाहीय.. क.. कोण.. तुम्ही ?!' मी माझी ओळख सांगताच त्यांनी लागलीच आपल्या जागेवरून उठून कडकडून मिठी मारली.. (कब के बिछडे हुए हम...!)

दोंघाच्याही डोळ्यांच्या कडा ओलावल्या होत्या. पुढच्या दोन मिनिटात 'आप' से 'तुम'.. 'तुम' से 'तू 'हो गयी..! डब्यात भजने सुरूच होती.. परंतु गप्पांना ऊत आला! मी दादरला उतरण्याआधी त्याने कागदाच्या एका कपट्यावर आपला पत्ता लिहून दिला. रविवारची भेट ठरवूनच दादरला उतरलो. 'ऑडिओ' मार्केटला जायला! मात्र तो संपूर्ण दिवस बेचैनीच गेला. दिवसभर मनात तेच विचार. नंदूदादा.. चक्क विरारला? रविवारी आम्ही उभयता त्याच्या घरी गेलो. ते वन-रूम किचन! ते मोजकंच सामान! कमाल वाटली..! मातृतुल्य वहिनींनी स्वागत केलं. इकडच्या तिकडच्या गप्पा मारता मारता सहज विचारलं.. 'नंदूदादा तू.. तू इकडे कसा काय शिफ्ट झालास..?' बाप रे ! त्यानं क्षणार्धात ओक्साबोक्शी रडायलाच सुरुवात केली. वहिनी तर तोंडावर पदर दाबून आत पळाल्या... आम्हाला काहीच कळेना.. मी सौ.ला आत पिटाळलं. पाचेक मिनिटात गाडी नॉर्मल हुंदक्यांवर येताच तो बोलू लागला.. 'तिच्या मारी.. त्या एकता कपूरच्या..!' अरे?! फिल्मस्टार जितेंद्र आणि त्याच्या कुटुंबियांशी याचा काय संबंध? नंतर त्याने जे सांगितलं, ते ऐकून आम्ही उभयता आश्चर्यचकित झालो. नंदूदादा तसा लवकरच बोहल्यावर चढलेला. त्याला दोन मुलं. हुशार! आज्ञाधारक! व्यवस्थित शिकले म्हणून नोकऱ्याही चांगल्याच मिळाल्या. चाळीतल्या छोट्या खोलीतला संसार पण मजेत चालायचं! कशाकशाची वानवा नव्हती. सगळं काही होतं. 'मज्जा नी लाईफ!' आम्ही आधीच 'शिफ्ट' झालेलो. पण त्याने दिलेल्या माहितीनुसार लवकरच चांगल्या घरच्या मुली सुना

म्हणून आणल्या. नातवंडंही झाली! चांगलं चाललेलं! नंदूदादा रिटायर झाला! मस्त तगडी 'पेन्शन' होती! मात्र, का कुणास ठाऊक! दुदैवाचा फेरा यावा तद्वत, अचानक घरातलं वातावरण या ना त्या कारणाने गढुळ होऊ लागलं. कारण काय?? टीव्ही वरच्या त्या अमुक मालिका !! त्यातील सादरीकरणाचा इम्पॅक्ट एवढा जबरदस्त की या चटकदार, भडक आणि उत्कंठावर्धक कथानकाची इतर महिलांप्रमाणे याच्या सुनांनाही भारी चटक लागली. जणू व्यसनच लागलं! त्याच्या सुना, मालिकांमध्ये दाखवतात तशा, घरात सुद्धा चक्क भरजरी कपडयात, मेक-अप करून वावरायच्या! छोट्या छोट्या कारणांवरून, एकमेकींकडे थेट अंगुलीनिर्देश करत, अगदी अद्वातद्वा बोलायच्या. अगदी 'टिपिकल' स्टाईलमध्ये! त्यामुळे घरात सतत कलह! घरातलं वातावरण बिघडू लागलं! काही काळानंतर तर कुणाचंच कुणाशी पटेना! आमच्या वहिनी तर परेशान होऊन सतत आजारी पडू लागल्या. 'सायटिका', 'डायाबेटिस' अशा रोगांनी विनाकारण ग्रासल्या! त्या वातावरणामुळे कुटुंबाचा विस्कोट होतोय हे लक्षात येताच, शेवटी या साऱ्या प्रकाराला कंटाळून नंदूदादानं चाळीतली ती खोली विकली! मुलांना त्यांचे वाटे दिले, आणि मोजकं सामान घेत तिथून काढता पाय घेतला! कुणावर अवलंबून राहून अपमानीत जीवन जगण्या पेक्षा त्यानं रिटायरमेंटच्या पैशात ही जागा घेतली आणि उत्पन्न मिळावं म्हणून या वयात तो एक पार्ट-टाईम जॉबही करू लागला! नंतर मुलांनीही उपनगरात वेगळे फ्लॅटस् घेतले. मुलांशी असलेल्या नात्याची नाळ तुटली नव्हती,

पण संबंध तुटक झाले होते एवढं मात्र नक्की! आमच्यासाठी हा धक्का होता! खरंच सांगतो! त्या अमुक काळात त्या टीव्हीवरच्या महामालिकांमुळेच, त्याच्याच नव्हे तर अनेकांच्या आयुष्यात दुःखदायक कलहांकित मालिका निर्माण झाली हे कटू सत्य आहे! एकेकाळी रेडिओ, टीव्हीचा दीवाणा असलेला दणकट नंदूदादा या टीव्हीमुळेच गलितगात्र झालेला पाहून काळीज पिळवटून निघालं! आज आमच्या आसपासच्या पिढीतल्या कुणालाही विचारा, या सीरियल्समुळे कित्येक कुटुंबात कलह निर्माण झालेत हे कुणीही सविस्तर सांगेल! एक नायक, त्याच्या दोन-तीन बायका, जायज-नाजायज मूल, प्रत्येक बाई-बाप्याचं काही ना काही लफडं! तो गुंता! दगा, बदला, कट-कारस्थान! बगावत, उर्मट वागणं, राजकारण! काल मेलेला आज जिवंत होतो काय, तर आजवर सुस्वभावी दिसणारी बाई अचानक खून करते काय! त्यातली 'बा' तर अमरपट्टा घेऊन आलेली! नातवंडंच काय पतवंडांच्या लग्नातही चेहरा तुकतुकीत! झगमगीत वेशभूषा, भव्य सेट्स.. मयतालाही महागड्या साड्या घालून मिरवणाऱ्या बायका.. सुटाबुटात वावरणारे बाप्ये.. कथानक म्हणजे मूर्खपणाचा कळस आणि निर्बुध्दपणाची परिसीमा! पण काही महिलांना त्याचा भारी सोस! छ्या!! फॅमिली-लाईफचा इस्कोट केला या मालिकांनी! अशी उद्ध्वस्त झालेली कुटुंब पाहून, एकेकाळी टीव्हीची 'इडियट बॉक्स' म्हणून संभावना करणाऱ्याला मी मनातल्या मनात माझ्यातर्फे तरी 'पद्मपुरस्कार' हा किताब

सन्मानानं देऊन टाकला! घरात आलो पण कशातच लक्ष लागेना! टीव्ही पाहून त्याला विचारावंसं वाटलं.. कोण होतास तू काय झालास तू...!

ही गोष्ट भले मी आमच्या या नंदूदादाला भेटलेल्या क्षणाची होती. परंतु हे मी हल्लीच चक्क अगदी दोनेक वर्षांपूर्वी सुद्धा अनुभवलेय! मुलाचं थाटामाटात लग्न करून घरात आणलेली एक सूनबाई, सासरचा मोठ्ठा फ्लॅट असूनही जवळच्याच एका इमारतीत 'वेगळं व्हायचंय मला..!' या स्टाईलने जवळच्याच एका इमारतीतला 'फ्लॅट' भाड्याने घेऊन रहायला गेली. कारण त्याचा तो मुलगा आणि ती, अमुक कंपनीत उच्चपदस्थ अधिकारी होते. घरातली कामं करायचा, किंवा सासूला मदत करायचा कंटाळा! असो! एकुलता एक मुलगा म्हणता, त्या पालकांचा जीव तीळ तीळ तुटणं स्वाभाविक होतं. यातली गंमत काय? तर त्यांच्यासाठी नाश्ता, दुपारच्या 'लंच'साठीचा डबा, रात्रीचं जेवण हे याच पालकांच्या घरातून जात असे बरं! अकरा महिन्यांचा त्या भाडयाच्या 'फ्लॅटचा' करारनामा संपताच, ते जोडपं झक मारत आपल्या घरी परतलं. तो 'टी.व्ही.' सीरियल्सचा 'इफेक्ट' होता, परंतु त्यांचे पाय वेळीच जमिनीवर आले, हे नशीब!

टीव्ही कधी आले ठाऊकेय? आयात केलेल्या 'टीव्ही'वर १५, सप्टेंबर १९५९ मध्ये दिल्लीत एका छोट्या ट्रान्समिटरच्या सहाय्यानं प्रायोगिक तत्वावर प्रसारण करून पाहण्यात आलं. पुढे सन १९६५ मध्ये दिल्लीत भारत सरकारच्या

शेवटी माणसाला काय हवं? चांगली नोकरी! छानसं घर! भरपूर कमाई! अंगावर काम, दाबून पगार! कमरतोड मेहनत करावी लागतेय पण तक्रार नही! मात्र प्रवासात हाडं खिळखिळी करत घरी यावं, फ्रेश व्हावं! घरच्यांशी शांतपणे संवाद साधावा. एकत्र जेवण घेत गप्पा माराव्यात! आणि नंतर टीव्हीवर जगभरातल्या घडामोडी पहाव्यात तर रिमोट सौ.च्या हातात..! रात्रौ ११ पर्यंत बिनडोक सीरियल्स..! त्या संपल्या की नंतरच पानं वाढणार! जेवतानाही सीरियलचीच चर्चा.. घरात एकमेकांशी संवाद नाही..गप्पा नाहीत...! अशा परिस्थितीला माणूस कंटाळणार नाही तर काय! कुणी कुणी काय भोगलं असेल, त्यांनाच ठावे!

'प्रसार भारती'शी संलग्न असलेल्या 'ऑल इंडिया रेडिओ' व्दारे दैनंदिन प्रसारण सुरु झालं. दिल्लीत त्यावेळी किती लोकांकडे 'टीव्ही' होते, किती लोकांनी 'टीव्ही' घेतले, काय पाहिलं कुणास ठाऊक! मुंबईत ते लोण लगेच आलं नसावं. कारण 'टीव्ही' नामक उपकरणाची चर्चा घरातच काय, बाहेरही कुणी करत नव्हतं, हे मात्र नक्की! 'मेरे तो गिरिधर गोपाल, दुसरो न कोई..!' या चालीत आम्ही आमच्या रेडिओवरच फिदा होतो. १९७२ ची गांधी-जयंती आठवतेय! याच दिवशी 'टीव्ही'चे कार्यक्रम मुंबईत दिसू लागल्याचं शेजारच्या रेडिओकाकांनी सांगितलं! याच आसपास आमच्या रॉबर्ट मनी शाळेतल्या बाईंनी 'टीव्ही'ची गोष्ट सांगितली. त्या छोट्या पडद्यावर चित्र नेमकं कसं दिसणार या विषयी आता मात्र प्रचंड कुतुहल निर्माण झालं. हळुहळू मुंबईत 'टीव्ही' येऊ लागल्याची कुणकुण लागली. अर्थात

तेव्हा 'टीव्ही' मोजक्याच श्रीमंत लोकांकडे होते. ज्यांचे नातेवाईक परदेशात होते त्यांच्या घरात 'सोनी', 'नॅशनल'च्या टीव्हीनं आधीच ठाण मांडलं होतं. आम्ही तेव्हा खूप लहान होतो. याचं कुतुहल आणि हौस एवढी की, आधी वरळीला जाऊन उंच टीव्ही-टॉवरचं दर्शन घेतलं! नंतर खाऊच्या पैशातून पदरमोड करून बसने, तीन कि.मी. दूर नाना-चौकात राहणाऱ्या आमच्या मित्राकडे 'टीव्ही' पहायला म्हणून गेलो होतो. तो मस्त दिसणारा 'सोनी' कंपनीचा 'टीव्ही'! त्याचा स्क्रीन, ते आकर्षक असं भलं मोठं धूड पाहून, सॉलिड कन्फ्युजलो! या स्क्रिनवर चित्र दिसणार? ते कसं काय बुवा? 'त्यात काय मोठंसं?' जेम्स बॉन्डच्या पिक्चरमध्ये आम्ही तो दहा वर्षापूर्वीच पाहिल्याचं काकांनी सांगताच, आमच्या भुवया उंचावल्या!



कधी बघायला मिळणार? या टीव्हीवरचे कार्यक्रम? आमचं बॅडलकच खराब! आमच्याच काय, कोणत्याच चाळीत 'टीव्ही' आला नव्हता! ते महाग होते. टीव्हीची

किंमत सुमारे चार हजार! चांगल्या पगारदारांची दोन ते पाच पगारांएवढी ही रक्कम! ‘२४ कॅरेट’ दहा ग्रॅम सोन्याचा भाव सुमारे रू. २१०/- वगैरे होता म्हणजे समजून जा! यामुळे ‘टीव्ही’ ही तशी चैनीचीच वस्तू! सुरूवातीला बहुदा ‘ईसी’ हा एकच मान्यताप्राप्त ब्रॅन्ड असावा! कारण तोच सगळीकडे दिसायचा. त्याचीच वाखाणणी केली जाई. तो आधी बुक करावा लागे. पुढे वेस्टन, नॅशनल, क्राऊन, सॉलिडेअर वगैरे ब्रॅन्डस्ची चलती झाली! ते सहज उपलब्धही होऊ लागले. ब्लॅक-अॅन्ड-व्हाईट! ‘व्हॉल्व’चे! ती लाकडी कॅबिनेट! सरकती शटर्स! ते टिपिकल लॉक!!

आजच्या पिढीला माहीतही नसेल की, ‘रेडिओ’ आणि ‘टीव्ही’ खरेदी करताना, त्याच्या वापरासाठी एक ‘लाईसेन्स’ घ्यावं लागे. त्यासाठी रेशन कार्ड वगैरे आवश्यक बाबींची पूर्तता करावी लागायची. अमुक रक्कम भरताच ते ‘लाईसेन्स’ मिळायचं! ते एक ‘बुकलेट’ असे! त्याचं दरवर्षी नूतनीकरण करावं लागे! सरकारकडे तो परवाना ‘वैध’ राहण्यासाठी, पोस्टात वार्षिक फी भरावी लागे! वर्षाच्या शेवटच्या आठवड्यात तर चिक्कार लाईन लागायची पोस्टात! अमुक रूपये भरून आपल्या ‘बुकलेट’ वर नूतनीकरण झाल्याचा ‘स्टॅम्प’ मारून घेतला की काम फत्ते! हे ‘लाईसेन्स’ प्रकरण १९८०च्या मे महिन्यापर्यंत सुरू होतं, म्हणे!

त्या दिवसात टी.व्ही. आणणं हा खरोखरच एक आनंददायी सोहळा असायचा. नाहीतरी, आमच्या चाळीच्या आवारात ‘टेम्पो’ तसा अभावानंच यायचा! कुणी गोदरेजचं कपाट, बॉक्स-बेड, सोफा कम् बेड वगैरे आणला तरच त्याचं दर्शन




होई! एक दिवस 'टेम्पो' आला तोच गुड-न्यूज घेऊन! छोट्या दोस्तांनी 'टीव्ही आला-टीव्ही आला' असा एकच गलका केला होता. गॅलरीत हीऽऽ गर्दी! टेम्पोतून मोठ्ठा बॉक्स उतरवताच, टाळ्या!! वरच्या मजल्यावरच्या शामूअण्णांनी तो आणलाय म्हणता, आम्हा सर्वांचीच कॉलर टाईट झाली! कारण त्यांचा मुलगा प्रदीप आमचा खास मित्र! गणपतीबाप्पाची शाडूच्या मातीची मोठी मूर्ती जितकी काळजीपूर्वक आणतात तसा हा बॉक्स दोघांनी अण्णांच्या खोलीत नेऊन टेबलावर स्थानापन्न केला. त्यांच्यामुळे चाळीला जणू नवी झळाळी प्राप्त झाली होती. (ज्या चाळीच्या टेरेसवर जास्त ॲन्टेना ती चाळ अमीर लोकांची.. बाकी सब बकवास!) त्या दिवसापासून, त्या कुटुंबाची सगळीकडे सॉलिड वट वाढली. नेहमी कुरापत काढून भांडणाऱ्या शेजारच्या काकू, त्यांच्याशी मायावतीपेक्षाही नरमाईने वागू लागल्या! महापौरांना जसा मुंबईच्या प्रथम नागरिकत्वाचा मान, तसंच शामूअण्णांच्या कुटुंबाचं चाळीत सॉलिड मानपान होऊ लागलं! पुढच्याच मिटिंगमध्ये त्यांना, आमच्या चाळ-कमिटीचे 'चेअरमन' करण्यात आले. स्कुटर पार्किंगवरून शामूअण्णा आणि

तळमजल्या वरच्या दादांमध्ये नेहमी जुंपायची. ‘टीव्ही’ येताच दादांनी आपल्या खिडकीलगतचा ‘पाच बाय दोन’चा  महत्वाचा भूखंड त्यांना प्रेमाने पार्किंगसाठी देऊन टाकला. प्रदीप अभ्यासात उजवा पण क्रिकेटमध्ये शून्य! तरी त्याची चाळीच्या टीममध्ये सन्मानानं वर्णी लागली होती! त्याच्याकडे ‘टीव्ही’ आहे म्हणून तो चक्क पहिली बॅटिंग-बॉलिंग करायला जायचा. एकदा ‘आऊट’ झाला तरी पुन्हा ‘बॅटिंग’ करायला अगदी रूबाबत यायचा! ‘हक बनता है यार!’ त्या दिवाळीत आपल्या ‘बोनस’च्या रकमेतून चार घरी ‘टीव्ही’ आले. ‘आनंदी-आनंद झाला’! आता त्यांच्या एकाच दारात होणारी जिवघेणी ‘गर्दी’ काहीशी विभागली. हुश्श!

आयुष्यात पहिल्यांदाच मी टी.व्ही. पाहिला. ‘ब्लॅक ॲण्ड व्हाईट’ प्रक्षेपण! तरीही तो आपलासा वाटला. ‘पारसमणी’ हा सिनेमा, एका अमुक क्षणी अचानक रंगीत होऊन जातो ना! तसा हा टी.व्ही. सुद्धा रंगीत झाला तर? असा विचारही क्षणात चमकून गेला. आम्ही लहानथोर सर्वच जण टी.व्ही.च्या भजनी लागलो. कानामनात रूजलेल्या रेडिओच्या ‘सिग्नेचर-ट्यून’ नंतर आता दूरदर्शनच्या ‘सिग्नेचर-ट्यून’नेही मनात घर केलं.  अभ्यास वेळेतच उरकून कधी टी.व्ही. बघायला जातोय असं वाटायचं. सरकारी नोकरीतले बरेच जण ‘टीव्ही’ बघायला म्हणून कामावरून लवकर ‘कल्टी’ मारायचे! आमचं संध्याकाळी, दिवस पूर्णतः मावळेपर्यंत मैदानात खेळणं काहीसं आपसुकच कमी झालं. संध्याकाळच्या सहा वाजण्याची लोक चातकासारखी वाट पाहू लागले.  छायागीत - चित्रहार बघण्यासाठी

आतुरलेले असायचे. आपल्या तरूण मुला-मुलींनी सातच्या आत घरात यावं यासाठी पूर्वी पालकांना त्यांच्या कानी-कपाळी ओरडावं लागे. 'टीव्ही'मुळे हा प्रॉब्लेम झटक्यात सॉल्व्ह झाला!

बुधवार, २५ जून १९७५चा दिवस आठवतोय! बुजुर्गांच्या गप्पांमधून, देशात बुधवार, दि. २५ जून १९७५ रोजी आपल्या देशात 'आणीबाणी' जाहीर झाल्याचं कळलं. (हा काय प्रकार आहे याबद्दल आम्ही अनभिज्ञ होतो!) नंतर हळुहळू त्याचे 'आफ्टर-इफेक्टस्' समोर येऊ लागले. बुजुर्गांच्या गप्पांमधून समजलं की, देशातील आर्थिक संकटे, विद्यार्थी आंदोलने, रेल्वे संप, राजकीय अस्थिरता वगैरे कारणांमुळे ही 'आणीबाणी' झाली होती, म्हणे! (याविषयी 'यू-टयुब' वरचा ऊहापोह नक्की पहा.) बडे नेते तुरूंगात तर पब्लिक टेन्शन में! या काळात 'टीव्ही' खूप कमी लोकांकडे होते. ज्यांच्याकडे होते त्यांच्याकडे मुंग्या लागल्यासारखी गर्दी होई. रेडिओवरच्या बातम्यांनी पोट भरत नसे. टीव्हीवरच्या बातम्या बघायला जीव कासावीस व्हायचा. नंतर दबक्या आवाजात चर्चा व्हायची! वीस-कलमी कार्यक्रम, गरीबी हटाव, कुटुंब नियोजन, नसबंदी कशाशी खातात हे कळण्याचं ते वय नव्हतं. मात्र नाकाबंदी, संचारबंदी, कर्फ्यू वगैरे शब्द आम्हाला या इमर्जन्सीमध्ये चांगलेच कळले! का कोण जाणे, या काळात आमच्या चाळीत इतर कुणी 'टीव्ही' विकत आणण्याची हिंमत तरी केली नव्हती! या 'आणीबाणी'च्या काळात 'आँधी' तसेच 'किस्सा कुर्सी का' या चित्रपटांवर बंदी आली! पुढे 'ऑल

इंडिया रेडिओ' वर गायक 'किशोरकुमार' च्या गाण्यांवर सुद्धा बंदी आली होती. (याविषयीच्या अधिक माहितीसाठी 'लिंक' वर 'क्लिक' करा!) १९७७च्या सार्वत्रिक निवडणूका १६ ते २० मार्च, १९७७ रोजी झाल्या. त्याही चक्क 'आणीबाणी'च्याच काळात, हे विशेष! या निवडणुका काहीशा धास्तावलेल्या अवस्थेत झाल्या होत्या हे जाणवलं होतं. त्यानंतर ही 'आणीबाणी' सोमवार दि. २१ मार्च, १९७७ रोजी उठविण्यात आली. या निवडणूकांचा निकाल लोकांनी या टीव्हीवरच पाहिला! बहुदा याच निकालाच्या वेळी लोकांनी टीव्हीला चिकटून रहावं म्हणून टीव्हीवर तीन-तीन पिक्चर्स सलगपणे दाखवण्यात आले होते. निकाल अनपेक्षित लागले! कॉंग्रेसला चीत करून जनता पार्टी निवडून आल्यामुळे माहौलच बदलून गेला होता! याच टप्प्यावर 'टीव्ही'चं महत्व लोकांना पटू लागलं. रेडिओ आणि टीव्ही या दोन्ही गोष्टी घरात असायलाच हव्यात, असा एक विचारप्रवाह निर्माण झाला! पण खरं सांगू! इथेच आपल्या लाडक्या रेडिओवरचं प्रेम उतरणीला लागलं होतं. जवळच मिनर्व्हात 'शोले' धुमाकुळ घालत होता. मराठा मंदिरला रिपिट-रन 'अलबेला', तर अलंकारला 'जय संतोषी माँ'! याच काळात या 'टीव्ही'नं सगळ्यांवर गारूड करण्यास सुरुवात केली! अण्णांच्याच नव्हे तर चाळीतल्या ज्यांच्या घरात 'टीव्ही' होते त्यांच्या दाराबाहेर प्रचंड गर्दी व्हायची. तिथे बसण्यासाठी हक्काची जागा मिळवण्यासाठी, चाळीतल्या बायकां-मुलांमध्ये जणू 'जिहाद' पुकारल्यागत अहमहमिका सुरू झाली. चटई म्हणजे स्टॉल ! खुर्ची

म्हणजे बाल्कनी! आम्ही मुलं कधी स्टॉल तर कधी बाल्कनी ! एरवी आमची रविवार संध्याकाळ ही तशी आळसावलेली असायची. खेळून-बागडून अंगात क्षीण यायचा. पण हा 'टीव्ही' आल्यावर मात्र 'मानो के हमारी दुनियाही बदल गयी..'! रविवारचा चित्रपट म्हणजे पर्वणीच! टीव्हीवर एखादा सुपरहिट चित्रपट असला की, इथे मुंबई-बंद सारखा माहौल! सगळं मस्त आणि सुरळीतपणे चाललेलं! पण हल्ली मात्र एक नविनच 'लोचा' निर्माण झाला होता.. रविवारी 'टीव्ही' वर एखादा चांगला चित्रपट लागणार याची कुणकुण लागताच, ज्यांच्याकडे 'टीव्ही' होते त्यांच्याकडे अचानक नव-नवे 'नातेवाईक' अगदी सहकुटुंब यायला लागले! अगदी अचानक! रविवारी सकाळी आलेले पाहुणे संध्याकाळचा पिक्चर पाहूनच



परतायचे. फारच कुचंबणा व्हायची. या आगंतुकांमुळे रिझर्व्हड-सीटस्वाल्यांचे वांधे व्हायचे हो! बायका चरफडायच्या. आमच्या सुदैवाने त्यांची मोनोपॉली फार काळ टिकली नाही. रेडिओकाकांच्या शेजारच्या परबकाकांनी सुद्धा 'टीव्ही' आणला.

झालं! गर्दी परत विभागली! हे परबकाका नुकतेच रिटायर झालेले! हे परबकाका नुकतेच रिटायर झालेले! ते मोठ्या सरकारी हुद्द्यावरून निवृत झाल्याने 'दबा के पेन्शन!' होती आणि 'मज्जा नी लाईफ!'. चाळीतल्या इतर बायका भाजीवाल्याशी किंवा दुकानदारांशी दोन-चार आण्यांसाठी सुद्धा हुज्जत घालताना दिसायच्या पण आमच्या या परबकाकू चाळकरी असूनही कधीच तसलं 'निम्न स्तराचं!' काम करताना आढळल्या नाहीत. शांत निवृत्त जीवन जगणारं हे जोडपं. ते कुणाच्याच भानगडीत नसत. दार सदानकदा बंद! दोन्ही मुलींची लग्न झाल्याने घरात दोघंच! आता मात्र सगळ्यांचंच फावलं. लोकांनी अचानक अहमहमिकेने त्यांच्याशी चांगले संबंध प्रस्थापित केले! आमचीही बऱ्यापैकी सोय झाली! आता प्रेमाचा ओघ इथंही सुरु झाला. लोकांचं जाणं-येणं वाढलं. या काळात ज्या शेजाऱ्यांकडे 'टीव्ही' होता, त्यांच्या घरी सन्मानाने मोक्याची जागा बसायला मिळावी म्हणून लोक काय काय करत असत, ठाऊकेय? बुधवारी, शुक्रवारी किंवा रविवारी कोंबड्या-मटणाचा खास बेत असल्यास मोठी वाटी उतू जाईल एवढी सागुती आणि डबाभर वडे आपल्या हक्काच्या घरी अगदी आग्रहपूर्वक पोचते व्हायचे. ती धूर्त-कावेबाज अशी 'इन्व्हेस्टमेंट' असायची बरं! श्रीखंड-पुरी, पुरणपोळ्या, भजी, वडे! पदराआड लपवून बरीच पार्सल जात! जणू रतीब घातला जाई! त्या देणाऱ्या काकी मग महाराणीच्या रुबाबात, त्यांच्या छपरी पलंगाच्या टोकाशी बसकण मारत. 'बाकीचे गेले तेल लावत'! दोनेक महिन्यात परबकाका-काकूंच्या चेहऱ्यावर बाळसं आलं,

हेही नसे थोडके! आपल्या वयोवृद्ध आई-बाबांच्या चेहऱ्यावरची ती 'आरोग्यसंपन्न' तकाकी पाहून, सणासुदीला येणाऱ्या त्यांच्या मुली अतिशय सुखावायच्या! रेडिओ काकांनी आम्हा मुलांना कधीच ब्लॅकमेल केलं नव्हतं! पण पुढे-पुढे या 'टीव्ही'च्या वेडापायी आईच्या हट्टामुळे आम्हाला परबकाकांकडे चक्क 'गुरूकुल' पध्दतीचा (मजबुरीने) अवलंब करावा लागला. (याचं दु:ख आहेच!) सहाचं पिक्चर! पण आम्हां तीन मित्रांच्या आईंच्या धमकीवजा सूचने प्रमाणे जागेसाठी फार मेहनत करावी लागे! 'गुप्तहेर' खात्याच्या दर्जाइतपत त्यात चाणाक्षपणा लागे. त्या दिवशी कोणता 'सिनेमा' आहे? नेमकी किती गर्दी होईल! कलावंत कोण? यासह अनेक बाबींवर अभ्यास करावा लागे! आम्हां तिघांच्या मातोश्रींना व्यवस्थित मिळेल अशी जागा मिळवायला, फिल्डिंग लावावी लागे! आम्ही तिघं दुपारी भाजी, वडे-सागुती पोहोचवण्याच्या निमित्ताने चाचपणी करायचो, तर संध्याकाळी साडेचार-पाचलाच पोहोचावं लागे, जागा अडवायला! तिथलाच झाडू घेऊन बैठक मारतात ती जागा स्वच्छ केली, की निवांत! (त्या संध्याकाळसाठी अगदी व्यवस्थित प्लॅन करून ठरवलेली आम्हां बालमित्रांची 'क्रिकेट-मॅच' असली, तरी काळजावर दगड ठेऊन रद्द करावी लागे!) काकू आमची वाटच बघत असे. तिची कामं नेमकी खोळंबलेली असत. (हे त्यांच्या मते भले ते आमचं 'परिस्थितीजन्य शोषण' (एक्सप्लॉयटेशन) नसेलही! पण  हल्ली त्यांच्या कृतीतून काही वेळा, त्याला काहीसा 'स्वार्थीपणाचा' वास येऊ लागला होता, हे मात्र नक्की! पण ही गोष्ट आपापल्या आईला कशी

सांगणार ?) काका-काकू तसे बिचारे एकटेच! नशीब.. ते पाय चेपायला वगैरे लावत नसत! पण घरातली बरीच कामं करून घेत असत. आम्हा तिघांना तिथे आपले पणाने राबताना पाहून, त्या इतक्या आनंदायच्या की बस्स रे बस्स! त्या '..मला हे दत्तगुरू दिसले..' हे गाणं सुद्धा गुणगुणायच्या! मग काहीशा सौम्य शब्दात फर्मान निघायचं..! यात कधी वाण्याकडून तिखट, मीठ, चहा पावडर आण, तर कधी भय्याकडून कोथिंबीर-मिरच्या आणून दे वगैरे वगैरे! त्या थोडे जास्त पैसेही देऊन ठेवत. काकू आम्हाला ती 'लाच' (चिरिमिरी, 'कीप द चेंज!') म्हणून नाही, पण.. 'रावळगाव' चॉकलेट, जाडया वाण्याकडचे 'वेफर्स', सल्लूमियांच्या बेकरीतला 'ब्रेड-रोल', 'पोंगे' यासाठी 'फंडिंग' करत असत! तसं पहायला गेलं तर.. आमची मानसिकता वेगळीच असायची! स्वतःला आणि आईला सुद्धा तिथे सन्मानाने जागा मिळावी, या सद्हेतूने आम्ही ती कामं आनंदानं करत असू, नव्हें! ती झक मारत करावीच लागत! (खरं तर.. आज 'एम.बी.ए.' करताना 'मटेरियल, टाईम, मार्केटिंग-मॅनेजमेंट' वगैरे शिकवतात ना! आम्ही त्या गोष्टी इथे आपसुकच शिकलो. त्या अंगवळणी पडल्या, हे मी कसं विसरू!) आमचं रेडिओवरचं प्रेम आटलं नव्हतं पण 'टीव्ही'नं नादावलं होतं एवढं मात्र नक्की! अथक मेहनतीने जागा मिळवण्यासाठीच्या, आमच्यातील उत्स्फूर्ततेमुळेच की काय! आम्ही जवळजवळ सर्वच कार्यक्रम अगदी मांड ठोकून पहायचो. यात आमच्या आया-बहिणीही मागे नव्हत्या बरं! त्या काळचे सिनेमे सुमारे तीनेक तासांचे असत. (त्यापेक्षा मोठेही

असत! ‘लिंक’) त्यामुळेच ‘टी.व्ही.’वाले वैतागायचे. दहा बाय-बाराची खोली! त्यात पाय ठेवायलाही जागा नसे! वर गरगरणारा एकच पंखा! घरात घामाचा कुबट दर्प येत असे. दरवाजाबाहेरही गर्दी! यजमानाचं काय? ‘कावळा करी आहेर, घरची माणसं घराबाहेर!’.. काही ठिकाणच्या शिघ्रकोपी शेजाऱ्यांनी, अमुकांना हाकलून दिल्याचंही ऐकिवात आहे. आमच्या नशिबी ते भोग आले नाहीत, हे आमचं सुदैव! ही ‘बला’ टळावी म्हणून काही जणांनी चक्क जाळीचे दरवाजेही बसवून घेतले होते! सुदैवाने एखाद्या घरी गर्दी कमी असेल तर एकीकडे ‘टी.व्ही.’ पाहता पाहता आमच्या आया-बहिणी ‘भाज्या’ साफ करायला/निवडालाही घेत! आणि जर, तो दिवस जर नेमका ‘ऋषी-पंचमीचा’.. म्हणजे अळवाची ती ‘टिपिकल’ भाजी बनवायचा दिवस असेल ना! तर.. तौबा तौबा! महिला मंडळासाठी तर तो एक मोठ्ठा सोहळाच असायचा! जणू आपलं ‘पाक-कौशल्य’ पणाला लावायची त्यांच्यासाठी ती आयती संधीच असायची! त्या एकीकडे ‘टी.व्ही.’, बघत बघत भाज्या चिरायच्या खऱ्या! पण काही बायकांच्या मनात अमुक एकीबद्दल ‘आकस’ सुद्धा असायचा. पण तो खुन्नस दाबून ठेवला जायचा! कारण.. शेवटी येत्या ‘उन्हाळयात’ याच शेजारणी आपल्या घरी आपलेपणाने पापड लाटायला, लोणची बनवताना आपला आधारस्तंभ असणार आहेत, हे ‘सत्य’ कसं नाकारणार! ‘टी.व्ही.’ पाहणं हे निमित्तमात्र! पण ‘जिंदगी’ महत्त्वाची नाही का? तर ‘सखी-शेजारिणी’ आपल्यात ‘मेतकूट’ असल्यागत ‘टी.व्ही.’ वरचे सर्व कार्यक्रम अगदी जिव्हाळ्याचे संबंध

असल्यागत एकत्रितपणे ‘एन्जॉय’ करायच्या! (नाहीतरी आमची ‘चंदनासि परिमळ आम्हा काय त्यावे..’ अशीच मानसिकता असे!) समाचार, साप्ताहिकी, वेगवेगळया मालिका, विक्रम और वेताळ, रजनी, फुल खिले है गुलशन गुलशन, आमची माती आमची माणसं, प्रतिभा आणि प्रतिमा, उडान, दर्पण, छायागीत, चित्रहार, महाराष्ट्र की लोकधारा, ‘पेइंग-गेस्ट’, ‘तू तू मैं मैं’ अशा अनेक सिरियल्स! शनिवारचा मराठी तर रविवारचा हिन्दी चित्रपट! ‘सिनेमा’, ‘मालिका’, ‘बातम्या’ यांच्या प्रक्षेपणातत अर्ध्या तासाचा सलग ब्रेक मिळे!! यावेळेत बऱ्याच घरी कुकर लावला जात असे. पोळयाही लाटून होत. तर ‘टी.व्ही.’ वाल्यांना ‘रेस्ट’!




बातम्या! (आज कोणत्याही ‘न्यूज-चॅनलवर’ तीन मिनिटात दोन बातम्या दाखवून होताच जाहिरातींसाठी ब्रेक घेतातच घेतात. वर ते आपली ‘कॉलर’ पकडून धमकावल्यागत, कुठेही जाऊ नका! असं ठणकावून सांगतात! तेरी तौ!).. मित्रांनो! (या लेखासोबत मी, मला आठवल्या तितक्या ‘टीव्ही’ मालिकांचे ‘फोटो’ दिलेत, त्यावर ‘क्लिक’ करून मनमुराद आस्वाद घ्या!) मला आठवतंय, काही

लोक दूरदर्शनच्या सिग्नेचर-ट्यूनपासून जे टीव्हीला चिकटत ते थेट तो बंद होईपर्यंत! सगळं सगळं बघत! एवढीशी खोली त्यात ते टीव्ही वॉल्व्हचे! खूप गरम व्हायचे! जाम उकडायचं हो! तरी 'आपण यांना पाहिलंत का?', बहिऱ्यांसाठी असलेल्या त्या 'बातम्या', 'आओ मारी साथे (गुजराती)' सुद्धा ते चवीने बघत. ठिय्या आंदोलन ! मेरी झॉंसी नही दुंगी! धन्य हो!

शाळेचं वेळापत्रक, पाठ्यपुस्तकातल्या 'कविता' पाठ नसतील.. पण 'टीव्ही'वरच्या सर्व कार्यक्रमांच्या वेळा अगदी तोंडपाठ! त्यांच्या शीर्षकगीतांसकट! त्या वेगवेगळया जाहिराती, जिंगल्स.. एक तितली, अनेक तितलियॉं..!, व्हिक्स की गोली लो.. खिचखिच दूर करो, तंदरूस्ती की रक्षा करता है..! डाबर लाल दंतमंजन, कालनिर्णय घ्या ना!.. भूल न जाना, ईसीई बल्ब लाना.., जब मैं छोटा लडका था.., वज्रदंती वज्रदंती..! आय एम अ कॉम्प्लॅन बॉय (शाहिद कपूर, आएशा टाकिया)!! या तर आजही अगदी तोंडपाठ! 'पानपराग', 'हमदर्द-सिंकारा' सुद्धा आठवतात! आम्ही रविवारी दुपारची 'साप्ताहिकी' चक्क लिहून काढायचो. मोठी मंडळी त्यानुसार आपापला आठवडा प्लॅन करत असत. वर्तमानपत्रातला टीव्ही-कार्यक्रमांचा कॉलम वाचत! चर्चा करत! पुढे शालेय चित्रवाणी' हा दुपारचा कार्यक्रम सुरु झाला. कित्येक शाळांमध्ये टीव्ही आले. मुलांना ते दाखवले जात. दिवसा रेडिओवरचे सर्व कार्यक्रम, तर संध्याकाळी टीव्ही! 'मालिका'! गीत-संगीतात चिंब

भिजायचे ते दिवस होते! व्याऽऽऽव !! वॉशिंग पावडर निरमा...! लागलं की समजायचं, टीव्हीवरचा प्रोग्रॅम सुरू !

मला आठवतं, १९७४-७५ च्या आसपास इम्पोर्टेड कॅसेटस्‌चा जमाना आला. स्मगलिंगचा माल यायचा म्हणे! ६० आणि ९० मिनिटांच्या त्या कॅसेटस्!.. नोकरीनिमित्त दुबई-मस्कतला गेलेल्या कोकणी मुसलमान बांधवांनी ‘सोनी’, ‘टी.डी.के.’ वगैरे कॅसेटस् आणि टू-इन-वन आणले होते. कॅसेटस्‌ने झपाट्यानं



हातपाय पसरायला सुरूवात केली आणि इथेच रेडिओच्या अवमुल्यनाला सुरूवात झाली. पुढच्या दोन वर्षात तर त्याचा चांगलाच प्रसार झाला! सिनेमा-थिएटर्स, नाटकं, लाईव्ह-कार्यक्रम, रेडिओ, ग्रामोफोनच्या तबकड्या, टर्न-टेबल, रेडिओ-ग्राम, मंगलकार्यासाठी भाड्याने आणले जाणारे लाऊड-स्पीकर्स आणि इराण्याच्या हॉटेलमधला चवन्नी टाकताच गाणं ऐकवणारा ज्युक-बॉक्स, यामध्ये आता भर पडली ती टीव्हीची आणि नंतर टेप-रेकॉर्डर्सची! मनोरंजनाच्या कक्षा रूदावल्या!

रेडिओ काकांकडे टू-इन-वन  येताच त्यांनी रेडिओवरचे आपल्या आवडीचे सर्व कार्यक्रम टेप करून ठेवण्याचा सपाटा लावला होता. नंदूदादा तर ग्रेट! तो टीव्हीच्या स्पीकरजवळ टेप-रेकॉर्डर ठेऊन प्रत्येक 'छायागीत' टेप करून ठेवायचा. (कारण या क्षणापर्यंत 'कॅसेटस्' वर, आपण दिलेल्या 'लिस्ट' प्रमाणे गाणी 'भरुन' देण्याचा (पायरसीचा) 'धंदा-व्यवसाय' बोकाळला नव्हता!) आम्हां बच्चेकंपनीसाठी हा प्रकार, खरं तर जाचक होता! शूटिंगला जशी सायलेन्स! लाईटस्! कॅमेरा! ॲक्शन! अशा घोषणा देतात ना तसा हा दणकट नंदूदादा, सायलेन्स! असं ओरडायचा. मग काय!? अर्धा तास हाताची घडी-तोंडावर बोट! मध्ये कोणी पचकलं तर खैर नव्हती! बघ्यांची हीऽऽ गर्दी! तो कुणाकुणाला म्हणून गप्प करणार? तो आमच्यासारखे 'स्वयंस्फूर्त' सेवकही ठेऊ शकत नव्हता! शेजाऱ्यांमध्ये 'कलह' कशाला? मात्र दुर्दैव पहा! एकदा पिंट्याला कुणीतरी चिमटा काढला की काय, पिंट्या  कळवळून ओरडला! मग काय विचारता! नंदूदादानं त्याच्या पाठीत जोराचा धपाटा घातला. झालं! पिंट्यानं भोकाड पसरलं! आणखी एक धपाटा! खवळलेल्या नंदूदादानं, मेलेला उंदीर अगदी तुच्छतेने उचलून बाहेर फेकावा ना! तसा पिंट्याला उचलून खोलीबाहेर फेकला! छायागीत संपलं! पण कलहाची ठिणगी पडली! कोहराम! आपल्या लाडक्या एकुलत्या एक मुलाला, नंदूनं निर्दयपणे मारून बाहेर फेकलं.. हा राग सुरेशकाका पचवू शकले नाहीत! त्या रात्री चाळीत भयंकर भांडण झालं! 'टीव्ही' मुळे नुकताच कुठे स्नेहभाव वाढीस लागला

होता तर या भांडणामुळे निष्कारण दुष्मनी निर्माण झाली! दोन तट पडले. (त्याचं हिन्दुस्तान-पाकिस्तान असं नामकरणही झालं!) हा एपिसोड चक्क तीन तास रंगला! शिव्या! सात पिढ्यांचा उध्दार! टीव्हीवर निदान व्यत्यय, रूकावट के लिए खेद है! वगैरे पाट्या तरी येत, पण इथे तोही चान्स नव्हता! दुसऱ्याच दिवशी सुरेशकाका सहकुटुंब मार्केटला गेले! (जाम मनावर घेतलं होतं त्यांनी!) बायकोच्या चार सोन्याच्या बांगड्या, पेठेंकडे विकून जे पैसे आले, त्यात त्यांनी टीव्ही आणि ट्रॉली विकत घेतली, आणि हे सगळं हमालांकरवी टॅक्सीच्या टपावर टाकून ते वर्ल्ड-कप जिंकल्याच्या थाटात चाळीत परतले. पण हाय ! फारच थंड स्वागत झालं. कुणीच पुढे आलं नाही! आता सुरेशकाकांची गोची झाली. काच सामानापेक्षाही नाजूक असं हे धूड टपावरनं उतरवायचं तरी कसं? यक्षप्रश्न! सुरेशकाका पाप्याचं पितर, तर टॅक्सी-ड्राईव्हर म्हणजे हाडाची काडं.. तुणतुणा! सर्व प्रयत्न वाया गेले! गॅलरीतून गंमत बघणाऱ्या बायका त्यांची झटापट पाहून फिदी-फिदी हसत होत्या. त्या दोघांनाही ते जमेचना! शेवटी नंदूदादानेच ही कोंडी फोडली! सरळ सुरेश काकांकडे गेला. कालच्या झाल्या प्रकाराबद्दल 'सॉरी' म्हटलं! सुरेश काकांनीही दिलखुलासपणे हसत त्याला माफ करून टाकलं. झालं! आता शेजारी एकेक करत टॅक्सी भोवती गोळा होऊ लागले. काल कचाकचा भांडणाऱ्या नंदू आणि पिंट्याच्या माता गळ्यात पडून रड-रड-रडल्या! मघाशी फिदी-फिदी हसणाऱ्याही आता अश्रू ढाळत होत्या! चाळीतल्यांचं प्रेम हे असं असतं. 'तुझं माझं जमेना, पण तुझ्यावाचून

करमेना'! शेवटी अशा इमोशनल परिस्थितीत तो 'टीव्ही' सुरेशकाकांच्या घरी आरामात दाखल झाला. चाळीत आता सहा टीव्ही झाले! आमचा आनंद षटगुणी झाला! तसं पहायला गेलं, तर त्या काळात गावातल्या पाटील वगैरे जंक्शन माणसांच्या घरात टीव्ही असत! पुढे गावा-गावातल्या ग्रामपंचायतीतही टीव्ही आले! कार्यालयाजवळ टीव्हीसाठी खास दालनही उभारण्यात यायचं, किंवा तो पिंपळाच्या पारावर ठेवला जायचा. लहान-थोर, कच्चे-बच्चे मंडळी घोळक्या घोळक्याने येऊन बसत. कार्यक्रमाचा आस्वाद घेत! तुम्ही बिबळ्याला पकडल्यावर कोंडून ठेवण्याचा पिंजरा पाहिलायत? कार्यक्रम पाहून झाले की गावातला या एकमेव 'टीव्ही'ला तशाच प्रकारचे लोखंडी गज असलेल्या पिंजऱ्यात बंदिस्त करण्यात यायचं. बाहेर मोठं कुलुप ! काय दिवस होते यार!



क्रिकेटचा स्कोअर रेडिओवर ऐकणं हा खरंच एक आनंद सोहळा असायचा, आता टीव्हीवर बघायला मजा येईल असं वाटलं होतं! पण नाही! त्यात खूप फरक होता! रेडिओवरच्या हिंदी आणि नंतर काही प्रमाणात मराठीत सुद्धा

कॉमेंट्रीत मैदानावरच्या प्रत्येक हालचालीचं वर्णन असायचं, टीव्हीवर मात्र तसं नव्हतं. तो बिचारा कॉमेंट्रेटर जास्त काही बोलायचाच नाही. समोर दिसतंय ना?.. बघा गुमान! त्या काळात नेमका काय 'सेट-अप' असायचा, कुणास ठाऊक! फक्त तीन कॅमेऱ्यांचा सेट-अप! तोही धडपणे बघता येईल तर शपथ! 'आम्ही टीव्ही बघायला, आणि नेमके त्याचक्षणी कावळे बसून आमच्या त्या 'अँन्टेना' ची वाट लावायला, एकच गाठ पडली.. तर 'आमचा राम राम घ्यावा!' हेच उरायचं! हे प्रक्षेपण कसं असायचं? तर, एक स्टम्प्स्च्या रेषेत 'स्थिर', दुसरा बाजूने आणि तिसरा कॅमेरा फिरता असायचा! हाच एकमेव सेट-अप 'उपलब्ध' होता. कारण मॅचसाठी अद्ययावत 'कॅमेरे' उपलब्धच झाले नव्हते! भारतात तर नव्हतेच! हा इतिहास आहे! ते 'अनॉलॉग-टेप्स' प्रकारातील मर्यादित क्षमतेचे 'कॅमेरे' होते, असं वाचनात आलंय. म्हणजे.. 'एडिटिंग' तर शून्य! (तज्ज्ञांनी खरंच यावर प्रकाश टाकावा, ही कळकळीची विनंती!) तेव्हांच्या प्रक्षेपणात व्हायचं असं की.. चेंडू तटवला जाताच त्या बिचाऱ्या तिसऱ्या.. फिरत्या कॅमेऱ्याची भंबेरी उडायची. या कॅमेऱ्यात 'झूम' करून चित्रित करणं सोपं नव्हतंच! त्या बिचाऱ्या कॅमेरामनची अक्षरशः 'ढुंढो ढुंढो रे साजना.. मोरे कान का बाला..' अशी हालत व्हायची! त्या कॅमेऱ्यांचं चार्ली चॅप्लीन सारखं वेड लागल्यागत बॉलमागे धावणं, उत्तुंग षट्काराच्या वेळी त्याचं अवघं आकाश शोधणं, खूपच केविलवाणं असायचं! मग काय!? आम्ही टीव्हीचा साऊन्ड चक्क 'ऑफ' करायचो! बाजुला रेडिओ लाऊन, त्यावरची ती कॉमेंट्री

ऐकायचो! आवाज हमारी शकल तुम्हारी! रेडिओ नसेल तर मात्र हरि हरि ! तुका म्हणे उगी रहावे, जे जे दिसेल, ते ते पहावे...! नुसती गंमत होती! पुढे जेव्हा ऑस्ट्रेलियाच्या 'चॅनल-९'चं प्रक्षेपण पाहिलं ना! तेव्हा आम्हाला काय वाटलं असेल विचार करा! याबाबतीत 'केरी पेकर' यांचं नाव सन्मानानं घेतलं जातं. ते 'ऑस्ट्रेलियन-मिडिया टायकून' होते. 'चॅनल-९' चे सर्वेसर्वा! नंतर भारतासह जगभरात अद्ययावत 'कॅमेरा सेट-अप', 'एडिटिंग-सेट अप', त्यासाठीचं बजेट/तंत्रज्ञ मिळताच, आपल्याकडचं प्रक्षेपणही सुधारलं. मात्र तेव्हा 'स्टम्प' मध्ये बसवलेला 'कॅमेरा' व 'मायक्रोफोन', 'स्पायडर-कॅम', 'स्लो-मोशन', 'ॲक्शन-रिप्ले' वगैरे नव्हते. 'रिव्हू' तर नव्हते आत्ताचं प्रक्षेपण मात्र थक्क करणारं आहे.

त्या 'रामन राघव' नामक (१९६६-६७) माथेफिरू खुन्याच्या कारनाम्यांमुळे रात्री मोकळया मैदानात पथारी टाकणं, मस्त आराम करत 'रेडिओ' ऐकणं. विरंगुळा म्हणून तिथेच पत्ते खेळणं तर केव्हाच पूर्णतः बंद झालं होतं! तर १९७१च्या 'भारत-पाक' युद्धामुळेही बराच फरक पडलेला जनजीवनात! आता नवीन काय.. तर मुलं पळवणारी टोळी, नुकतंच सुरू झालेलं गॅंगवॉर..! अशा अनेक कारणांमुळे आमच्या लहानपणी पालक आम्हाला लांब पिकनिक किंवा दूरवर पाठवायला घाबरायचे. मात्र या 'टीव्ही' मुळे आमचं थोडंसं फावलं! आता आमचं मैदानात खेळायला जाणंही कमी झालं होतं. आम्हां मुलांसाठी तर एकच 'फतवा'! घरातच रहा! अभ्यास करा! रेडिओ ऐका किंवा टीव्ही बघा! दिल्ली तो

बहोत दूर! काहीही असो! टीव्हीमुळे एक फायदा झाला. स्वातंत्र्यदिनाचं ध्वजसंचलन, पंतप्रधानांचं भाषण, त्यादिवशीचे मस्त कार्यक्रम घरबसल्या पाहता आले. 'मिले सूर मेरा तुम्हारा..' आवडलं! ३१ डिसेंबरला आम्ही गेट-वे ऑफ इंडियाला रोषणाई पहायला जायचो. टीव्ही आल्यापासून मात्र त्या दिवशी पाय बाहेर निघेचना. खूप इम्पॅक्ट होता टीव्हीचा! त्याने जणू सगळ्यांनाच झपाटलं होतं. जिथे लेकीच्या लग्नात हुंडा देण्याची पध्दत होती, त्यात 'टीव्ही' ही आवश्यक गोष्ट बनली. जाहिरातींचा 'इम्पॅक्ट' पहा! तंबाखुची मशेरी घासणारे, तसेच माकडछाप, गुलाबी टुथ-पावडर लावणाऱ्यांनी कोलगेट, वज्रदंतीचा वापर सुरु केला. अफगाण स्नो आणि मीना खाकी फेस पावडर हीच सौंदर्य- प्रसाधनं म्हणून ठाऊक असलेल्या आमच्या आया-बहिणींनी लक्स, सिंथॉल, निविया, पॉन्डस, विको टर्मेरिक क्रीम, सुगंधित साबण, तेल, शाम्पू वापरायला सुरुवात केली. (भय्यांच्या यूपी-बिहार किंवा तत्सम गावरान भागात अंतर्वस्त्रे नावाचीही चीज असते, हे ठाऊक झालं ते या टीव्हीमुळेच! आपापल्या गावाला जाताना, त्यांच्या महेरारूसाठी सुद्धा इथनंच खरेदी होणं सुरु झालं!)) फॅशन उचलायची ती टीव्ही पाहून, हा ट्रेन्ड तर तस्साच, आजही अबाधित आहे!

चाळीच्या टेरेसवर लावल्या जाणाऱ्या ॲन्टेनाची गंमत आठवतेय! तो 'वरळी टीव्ही-टॉवरच्या' दिशेने लावावा लागे! मुस्लिम बांधव 'मक्का-मदिना' असलेल्या दिशेकडे तोंड करून 'नमाज' पढतात ना! अगदी तस्संच! हा 'ॲंटेना' काही

सरळमार्गी नव्हता! पतंगांची मांजाखेच, टेरेसवरील द्वाड-विकृत-खोडकर मुलांची मस्ती, कावळ्या-कबुतरांच्या आतंकबाजीमुळे जर ते थोडे तरी हलले ना तर खूपच ‘लोचा’ व्हायचा! ‘करे कौन, भरे कौन?!’ तशी तर ही फालतू ‘मगजमारी’! आमचे वैतागलेले पालक ते ‘कांड’ आम्हीच केल्यासारखे ‘वड्याचं तेल वांग्यावर..’ या चालीत आम्हाला रागे भरायचे! या ‘अॅन्टेनाच्या’.. दिशा-बदलाने ‘टीव्ही’ वरचं चित्र अक्षरशः विचित्र आणि वाकडं तिकडं दिसायचं! त्रासदायक हे होतं की, अमुक काळानंतर आमचे पालक ते ‘घासलेट, टर्पेंटाईन, थीनर’ वगैरे वापरून स्वच्छ करायला लावत! (हे काम टेरेसवर थेट ‘अँटेना’ लावलेल्याच ठिकाणी ‘ऑन-द-स्पॉट’ पार पाडणं खूप ‘धोकादायक’ वाटायचं यार!!) असो! मात्र त्या काळातल्या ‘टीव्ही’चे अमुकांनी फायदेही घेतलेत! सतत संपर्कामुळे अनेक ‘प्रेमविवाह’ झालेत/जमलेत! एक अजब किस्सा आठवतोय! एका रविवारी आमच्या चाळीतला, नुकताच ‘ग्रज्युएट’ होऊन ‘बँकेत’ नोकरीला लागलेला ‘प्रकाश’ (पक्या!)! त्या दिवशी केवळ  बाबांनी आदेश दिला म्हणून, हातात वायर व इतर गोष्टी घेऊन, तो टेरेसवर गेला होता! आपला ‘अँटेना’ साफ करायला म्हणून तो स्टुलावर चढला! पण चाळीतल्या काही ‘अती- जागरूक’ (‘आगलावे-बोंबमारे’) लोकांनी ते पाहिलं! मग काय? चाळीतले ‘ते’ शेजारी एका इशाऱ्यासरशी टेसेसवर लागलीच जमा झाले! त्यांनी ‘बाबापुता’ करत व नंतर जणू बळेबळेच त्याला त्या ‘स्टुला’ वरून खाली उतरवलं! ते मदतीला आलेत असं वाटून आमचा ‘पक्या’ गहिवरला! पण

कसचं काय! तो खाली उतरून, हातात येताच, पुढच्याच क्षणी शेजाऱ्यांनी त्याला झोड झोड झोडला! पोकळ बांबूचे 'सॉलिड' फटके दिले! (त्यांना 'शोले' मधल्या धर्मेंद्रचा तो 'सीन' आठवला की काय!!) बऱ्याच जणांनी मनातलं 'फ्रस्ट्रेशन' बाहेर काढत हात धुवून घेतले! तोवर त्यावे आई-बाबाही वर आले होते! 'पक्या' कन्फ्युजलेला! 'ये क्या को रहा है!?' मात्र काही मिनिटांनंतर चितळेकाकांनी त्याला चुचकारत सांगितलं.. 'बेटा, तुझं परांजपेंच्या 'स्वप्ना' वर प्रेम आहे, हे आम्ही सगळेच जाणतो! पण, निराश होऊन.. अशी आत्महत्या करणं, योग्य नाहीय!..' (बाप रे! पक्या केवळ, 'अँटेना' साफ करायला गेला काय! हा प्रसंग घडला काय? आणि त्याचं प्रेमप्रकरण गावभर झालं काय!) गंमत म्हणजे नंतर नंदूदादाने पुढाकार घेत, आढमुठया परांजपेकाकांना कसं पटवलं कुणास ठाऊक! पक्याचं त्या स्वप्नाबरोबर, सर्व शेजारीपाजारी, हितचिंतक, बालमित्रांच्या साथीने अगदी पुढच्याच महिन्यात 'शुभमंगल' झालं! त्या काळातला तो 'टीव्ही' आणि सगळं काही अमुक लोकांना फायदेशीर ठरलं होतं ना!.. ते असं!

आपल्यासह नव्या पिढीला पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी, मंगळवार, दि. ८ नोव्हेंबर, २०१६ च्या रात्री अगदी अचानक, ५०० व १०००च्या नोटांवर 'नोटबंदी' जाहीर केल्याचं पूर्णतः माहीत आहे! आपण सर्वांनी ते अनुभवलंय! त्या रांगा, चिंता, त्रास, ती मार्केटची गच्छंती, अशी ती सगळी परेशानी प्रत्यक्ष अनुभवलेल्या अमुकांच्या मनातल्या जखमा आजही ताज्या आहेत! त्याचा इथे थेट

संबंध नाहीय! पण मग ‘नोटबंदी’ हा विषय आणि ‘दूरदर्शनच्या आठवणी’ यांचा काय संबंध! येस! सही पकडे है! मित्रांनो! आमच्या लहानपणी आम्ही एक ‘नोटबंदी’ अनुभवलीय बरं! ती भले नोव्हेंबर, २०१६ इतकी त्रासदायक नव्हतीच नव्हती! (शांतपणे वाचा! कारण ‘आय एम् शुअर!’ ही गोष्ट अनेकांना कदाचित अजिबात माहीत नसेल!) असो! हे ताणून न धरता, ‘डायरेक्ट’ विषयावर येतोय! तर सोमवार दि. १६ जानेवारी, १९७८ रोजी, ढासळलेल्या अर्थ-व्यवस्थेमुळे तत्कालिन पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी ‘नोटबंदी’ जाहीर केली होती! (‘लिंक’) त्या काळात चलनात असलेल्या रू. १,०००, ५,००० व १०,००० या अमुक नोटांवर बंदी आणण्यात येऊन त्या ‘स्क्रॅप’ केल्या गेल्या होत्या! आम्ही तर आश्चर्यचकित झालेलो! या किंमतीच्या नोटा अस्तित्वात आहेत? ओ माय गॉड!! मीच नव्हे तर आमच्या पिढीतील जवळजवळ सर्वांच्यांच, त्या ‘नोटा’ पाहण्यात आल्या नव्हत्या! कशा येतील? त्या काळात लोकांचे पगारच हजाराच्या आत होते. पाच हजार, दहा हजारांच्या नोटांची तर गोष्टच सोडा हो!! माझ्या सुदैवाने मी ‘शाईन-ईट’ कंपनीत नोकरीला असताना, आमच्या ‘शेठ’ कडे ती हजार रूपयाची नोट, मला किमान एकदा तरी डोळे भरून पहायला मिळाली होती! गंमत ही, की या सर्वच्या सर्व ‘नोटांबद्दल’ ची माहिती, तज्ज्ञ व सर्वच बाबतीत अभ्यासू असलेल्या अशा, नंदूदादाने आम्हाला सविस्तरपणे सांगितली होती! त्याने तर आपल्या देशात एकेकाळी ‘एक लाख’ रूपयांची नोट सुद्धा होती असं सांगून आश्चर्याचा धक्काच



दिला! शाळेत असताना, आमच्या कोणत्याच शिक्षकांनी हे का सांगितलं नव्हतं? माहीत नाही! असो! आम्ही कॉलेजला विद्यार्थीदशेतच होतो! त्यामुळे श्रीमंतांकडे काय चाललंय याच्याशी घेणंदेणंच नव्हतं! पण तितक्यात एका बालमित्राने खबर दिली की, 'मराठा-मंदिर' सिनेमा थिएटरजवळच्या 'रिझर्व्ह बँकेच्या' आवारात चांगलीच गर्दी उसळलीय! त्यात आपल्या चाळीं मधले काही लोकही दिसले! आम्ही त्याला झापला! 'छट्! कायतरीच काय? मित्रा! इथे आपल्या दहा-वीस-पंचवीस-पन्नास रूपयांच्या 'पॉकेट-मनी'चेच अक्षरशः वांधे आहेत! तू नोटांचं काय म्हणतोस?..' पण तो 'पक्की-खबर' असल्यागत छातीठोकपणे म्हणाला.. 'मला.. त्या रांगेत उभा असलेल्या अठरा नंबर चाळीतल्या 'बंड्याने' सांगितलंय! लोहार-चाळीजवळच्या एका अमुक दुकानात, ओळखीतून आलेल्या लोकांना, तिथले काही मोठे शेठ लोक, 'त्या' हजार, पाच हजार वगैरे रूपयांच्या 'नोटा', अक्षरशः २००, ३०० ते ५०० रूपयांच्या रेटने बिनधास्त विकताहेत!' नंतर ते लोक 'रिझर्व्ह बँकेत'




रांगा लावून त्या ' वटवताहेत'! भले ती तेव्हां सॉलिड पसरलेली अफवा असेल! खरं खोटं देव जाणे! मात्र त्या काळात बऱ्याच जणांनी टीव्ही घेतल्याची दबक्या आवाजात चर्चा होत होती! हे नक्की! मुख्य म्हणजे ती गोष्ट अभिमानाने कुणी सांगण्याचा प्रश्नच नव्हता, कारण तो 'तेरी भी चूप, मेरी भी चूप!' असा खाजगी मामला होता ना! असो! दिवस जात होते. 'टीव्ही' बाळसं धरत होता. १९८२ उजाडला तो नवी स्वप्ने घेऊन. आशियाई स्पर्धेची जय्यत तयारी सुरू झाली होती. १९ नोव्हेंबर, १९८२ रोजी त्या स्पर्धांना सुरूवात होणार होती. एशियाडचा 'अप्पू' सगळ्यांचा लाडका झाला. याच मुहूर्तावर भारतात 'रंगीत' टीव्हीचं आगमन झालं. बऱ्याच तरूणांना 'एअरपोर्ट' वर ' लोडर- पॅकर' म्हणून 'टेंपररी' काम सुद्धा मिळालं! राष्ट्रीय प्रसारणालाही सुरूवात झाली. ऐपत होती त्यांनी रंगीत टीव्ही घेतले. चाळीत आता बऱ्याच जणांकडे टीव्ही होते पण रंगीत टीव्ही येण्याचे चान्सेस सध्यातरी नव्हते! बारा-पंधरा हजारांचा 'रंगीत' टीव्ही हे स्वप्नच होतं! २४ कॅरेट सोन्याचा

एक तोळ्याचा भाव सुमारे रू. १७००/- होता म्हणता, समझ जाओ! २५ एप्रिल, १९८२ ची ती संध्याकाळ! टीव्हीवरचे दिवसभराचे कार्यक्रम कृष्ण-धवल, तर संध्याकाळी रंगीत, असे ते दिवस होते! नंतर सोमवार,१५ ऑगस्ट १९८३ चं ध्वजसंचलन आणि पंतप्रधानांचं भाषण 'रंगीत' दिसलं. परिस्थिती असूनही घरी रंगीत टीव्ही घेऊया का असा प्रश्न विचारला तर उत्तर मिळायचं.. 'तुका काय खोटे गुण लागले? कशाक व्हयो रंगीत 'टीव्ही', डोळे खराब होतंत!'

मला १९८३ चा 'प्रुडेन्शियल-वर्ल्डकप' अगदी कालच घडल्यासारखा आठवतोय! (चंद्रकांत पंडित, समीर दिघे हे आमच्या 'रॉबर्ट मनी' शाळेतलेच असल्याने 'क्रिकेट'शी लहानपणापासूनच आमचा चांगलाच दोस्ताना होता!) पण, तोपर्यंतच्या 'वर्ल्डकप' मधील, आपल्या 'टीम-इंडिया'ची कामगिरी तितकीशी खास नसल्याने, मुद्दामच सगळ्या 'मॅचेस' नाही पाहिल्या! त्यात माझ्या घरात 'गेलाबाजार' असा 'ब्लॅक ॲण्ड व्हाईट टी.व्ही.' असल्यानेही असेल कदाचित! आणि खरंतर, नोकरी व इतर कामात व्यस्त असल्याने फावला वेळही नव्हता म्हणा! 'रेडिओ' मात्र ऐकायचो! (ही 'लिंक' अवश्य पहा!) मात्र आपल्या 'टीम-इंडिया'च्या काही मॅचेस मात्र मी आवर्जून पाहिल्या/ऐकल्या! काही 'रेडिओ'वर तर काही 'दुधाची तहान ताकावर भागवावी' या चालीत घरच्या 'ब्लॅक ॲण्ड व्हाईट टी.व्ही.'वर पाहिल्या! कारण एकच! त्या 'टीममध्ये' आमच्या किंवा आमच्या आसपासच्या वयाचे (कपिलदेव - १९५९, कीर्ति आजाद - १९५९, के. श्रीकांत -

१९५९, रवि शास्त्री - १९६२) अनेक 'क्रिकेटपटू' असल्याने आमच्या मनात काहीसं आपलेपण आणि जिव्हाळा तर होताच! परंतु त्यांची पुढची कामगिरी कशी असेल, याविषयी मात्र आमच्या मनाला चुटपुट लागलेली. त्या 'वर्ल्डकप' बद्दल आशा, आकांक्षा आणि आस्था कधी वाढली असेल बरं? ते नेमकं झालं असं की, १८ जून, १९८३ रोजीची, साखळीतल्या मॅचमधली आपल्या कपिलदेवची 'झिंम्बाब्वे' विरुद्धची ती १७५ धावांची खेळी! आणि नंतर २० जून, १९८३ रोजी भारताने जेव्हा 'ऑस्ट्रेलिया' सारख्या बलाढ्य संघाला ११८ धावांनी धूळ चारली ना! तेव्हां सपूर्ण भारतवासियांच्या आशा खूपच पल्लवित झाल्या! पण नेमक्या त्याच दिवशी 'पाकिस्तान' टीमने 'न्यूझिलन्ड' टीमला जेव्हा हरवल्याचं समजलं ना! तेव्हां दुधात माशी पडल्यागत दुःख झालं! काहीही असो, या 'मॅचेस्' बद्दलच्या लेखांमधून 'लॉर्डस्', 'ओव्हल', 'टेन्ट ब्रिज' अशा 'लंडन' मधल्या 'क्रिकेट-ग्राऊण्डस्' बद्दल कळलं! आस्था, आपलेपणाही निर्माण झाला! ज्येष्ठ समीक्षक शिरिषजी कणेकर, व्दारकानाथ संझगिरी, अभिजित देसाई अशा अनेकांच्या दैनंदिन लेखांमुळे त्या 'क्रिकेट-वर्ल्डकप' बद्दलच्या घडामोडीतील बरीच माहिती हासिल करता आली! दि. २२ जून, १९८३चा दिवस! 'उपांत्य फेरी'! भारतानं यजमान 'इंग्लंड' सारख्या बलाढ्य संघाला हरवलं ही बातमी आनंददायक होतीच. तर त्याच दिवशी 'वेस्ट इंडिज' संघाने 'पाकिस्तान' संघाला धूळ चारली या बातमीने संपूर्ण देश चक्क सुखावला होता! बस्स! आता इंतजार होता.. तो फक्त आणि

फक्त.. शुक्रवार, २५ जून, १९८३ या दिवसाचा! फायनल मॅच! आपली 'टीम' फायनलला!? हा 'एहसासच' मनाला आनंददायक गुदगुल्या करणारा होता! इतके दिवस 'वर्ल्ड-कप'च्या मॅचेस, मनाला आवर घालत.. 'रेडिओ'वर ऐकल्या!'ब्लॅक अॅण्ड व्हाईट टी.व्ही.'वर पाहिल्या! 'इटस इनफ!' काहीही झालं तरी संपूर्ण 'फायनल मॅच' ही 'रंगीत टी.व्ही.' वर पहायचीच पहायची! असा मनाशी चंग बांधला! सद्गुरू साईनाथ महाराज की जय!! 'लॉर्डस्' वर रंगणारी 'फायनल मॅच' बघायची तर होती.. पण घरचा 'ब्लॅक अॅण्ड व्हाईट टी.व्ही' लावून ती बघण्याचा अजिबात मूडच नव्हता. छ्या!! पण जेव्हा गावसकर लवकर आऊट झाल्याची धक्कादायक 'वाईट' बातमी आली तेव्हां मनोमन हादरलो! गडबड है यार! मोहिंदर, श्रीकांतच्या बॅटिंगच्या वेळी जेव्हा आसमंतात स्कोअर आणि पब्लिकचा आवाज बुलंद झाला ना! तेव्हां प्राप्त परिस्थितीपुढे मान तुकवून मी शेवटी घरचा 'टी.व्ही.' लावला. पण हाय! मजाच येईना! मी थोड्या वेळातच, कंटाळून घराबाहेर आलो. पाहतो तो काय? 'रंगीत-टी.व्ही' होते त्या शेजाऱ्यांच्या घरात-दारात, छट-पूजेपेक्षा गर्दी! आमचा निभाव लागणं कठीण होतं. काय करावं काहीच सुचत नव्हतं! तोवर साडेसहा वाजले होते. मॅच बघायला जीव तीळ-तीळ तुटत होता! कुणीतरी बातमी आणली, ती ऐकून नंदू आम्हाला टॅक्सीत घालून निघाला. गिरगावच्या दिशेने! दहा मिनिटात त्या ठिकाणी पोहोचलो. तो चक्क बियर बार होता यार! 'रेल्वे बार अॅन्ड रेस्टॉरन्ट'! तिथला तो टिपिकल वास! ते वातावरण! बाप रे, इथे बसून

मॅच बघायची? कुणी पाहिलं तर? 'येस! इथे हक्काचा रंगीत टीव्ही आहे, इथे 'उठा' म्हणून हाकलणारं कुणीच नाहीय, म्हणून इथेच बघायची! मी बघतो काय ते!'.. दहा रूपये बियर! 'बॉईल्ड चना-पापड'..फ्री ! आम्ही एक कोपरा पकडला! आम्ही कोल्ड्रींक्स तर दादा बियर रिचवत होता. वेटरच्या हातात बरीच चिल्लर कोंबल्याने 'बॉईल्ड चना-पापड'चा रतीब विनाउसंत सुरूच होता! आखीर में वो घडी आ गयी! आपण चक्क वर्ल्ड-कप जिंकला! एकच जल्लोष! एकाने बियरची बाटली शॅम्पेनसारखी जोर जोरात हलवत सगळ्यांना त्या फसफसणाऱ्या फेसाळ शिंतोड्यात भिजवलं! एक महाभाग कॅश काऊन्टरवर गेला! खिशातून नोटांची गड्डी काढली.. आणि ती काऊन्टरवर आदळत आनंदातिरेकाने ओरडला.. 'जिसके सामने जो है.. वो मेरी तरफ से रिपिट करो'.. तो प्रत्येक टेबलावर गेला. प्रत्येकाला हात मिळवला! आम्हा चारांपैकी, तीन जणांना 'कोल्ड्रींक्स' पिताना पाहून मात्र तो



भयंकर चिडला! त्याने आवाज दिला. त्याचे पंटर आले. त्या चार तगड्या माणसांनी आम्हाला घट्ट पकडून बळेबळेच बियर पाजली. (आयुष्यातली पहिली 'बिअर'!) इमोशन्स लक्षात घ्या! आपल्यापेक्षा केवळ एक वर्ष जास्त वयाच्या कपिलने वर्ल्ड-कप जिंकून दिल्याचा आनंद इतका, की त्या जल्लोषात.. विरोध..! काय कप्पाळ करणार? बियरची ती कडवट चव! वर्ल्ड-कप जिंकल्याची मिठास! बाटली संपवली! नव्हे.. ती संपवावीच लागली! झक मारत! आपण वर्ल्ड-कप जिंकलो! ती चव, ती नशा आजही जिभेवर रेंगाळतेय! बाहेर आलो तर रस्त्यात धम्माल चाललेली. जिंकलो! रास्ता रोको ! डबे बडवून लोक नाचत होते. टॅक्सी- बेस्टची बस थांबवून आतल्यांना कुणी मिठाई देत होतं, चहा पाजत होतं! फरसाणवाल्याने तर खांडवी-पात्रा-जिलेबी-ढोकळयाची खिरापत वाटली! त्या रात्री घराकडे आलो तो चोरपावलांनी! पण गंमत म्हणजे आमच्याकडे कुणाचं लक्षच गेलं नाही! सगळीकडे जल्लोष! उत्सव! दिवाळी! फटाके फुटत होते! अख्खी चाळ खाली मैदानात! दोन तास नुसती धमाल! एकमेव अक्षरशः टेन्शनमध्येच घरी गेलो! बाबा शेजाऱ्याच्या गजालीत रमलेले. तर आई शेजारणींच्या गराड्यात! ताटात पडलं ते आनंदानं जेवलो. नंतर घरातून 'कल्टी' घेतली! खाली उतरून पानवाल्याकडे मसाला-पान खाल्ल्यामुळेच ती बियर जिरली! पण चाळीखाली चाललेला 'तो' जल्लोष मी आयुष्यभर विसरू शकणारच नाही! नाईलाजाने त्या उशिरा रात्री आम्ही मजबुरीने, मैदानातच पथारी टाकली! तिथे अगदी दुधवाले-पेपरवाले येईपर्यंत आमच्या गप्पांना

ऊत आला होता! आजही त्या 'रेल्वे बार' जवळून सहज जाणं झालंच.. तर तो किस्सा आठवतो। ती नशा तो कैफ आजही ताजातरीन आहे! (अरे हो! हल्लीच '८३' (२०२१) हा चित्रपट आला होता. तो '१९८३ - वर्ल्डकप' वर काहीसा आधारित होता. याआधी 'एम.एस.धोनी' व 'सचिन तेंडुलकर' यांच्या जीवनावर आधारित सिनेमे सुद्धा आले होते, बरं! (दिलेल्या 'लिंक्स'वर ते अवश्य पहा!)

१९८४ नंतर टीव्हीनं मस्त अंगडाई घेतली! 'हम लोग' नामक काळजाचा ठाव घेणारी ती दैनंदिन मालिका येताच चित्र बदलून गेलं! 'लिंक'! दादामुनींचं (अशोक कुमार) निवेदन! 'ये जो है जिंदगी' ही धमाल कॉमेडी सीरियल याच सुमारास आली. किशोरदांनी त्याचं शीर्षकगीत गायलेलं. बुनियाद (१९८६-८७) नंतर लोक टीव्हीच्या प्रेमात पडले! दूरदर्शन हे एकच चॅनल पण सर्वसमावेशक! कौटुंबिक मालिकांचा असा धमाका सुरू झाला, की बस्स रे बस्स!. नुक्कड, रजनी, (शीर्षकगीत : आशाताई) करमचंद, दादा दादी की कहानियाँ, उडान, कथासागर, मालगुडी डेज, तृष्णा, फौजी, भारत एक खोज, देख भाई देख, सुरभि, सर्कस, दर्पन, मिर्जा गालिब, रंगोली, वागले की दुनिया, मुंगेरीलाल.., मराठी नाटके, विविध मराठी विनोदी कार्यक्रम, गोष्टी गाण्यांच्या, किती नावे सांगू? क्रमवारी बघू नका! पण सर्व मालिकांनी खरंच काहीतरी दिलं. भरभरून दिलं!

१९८७ साल उजाडलं आणि डॉ. रामानंद सागरजींची 'रामायण' ही महामालिका सुरू झाली. सादरीकरण उत्कृष्ट दर्जाचं होतं. कलाकारांची निवड,

त्यांचा अभिनय, पटकथा-संवाद सगळं सगळं लाजवाब! या सीरियलमुळे आमचं भावविश्वच बदलून गेलं. रविवारी आरामात लोळत पडायचं ही सवय, पण 'रामायण' मुळे सगळं रूटिन बदललं. सकाळी लवकर उठायचं, आन्हिकं उरकायची आणि ९ वाजले, की टीव्हीसमोर बसायचं. एक तासाचा एपिसोड! त्या एक तासात सगळे व्यवहार ठप्प होत! वाणसामानच नव्हे तर इतरही दुकानदार शटर खाली ओढून घेत! रस्ते मोकळे! सगळीकडे सन्नाटा! सामसूम! 'रामायण'चे संवाद आसमंतात घुमत. एकेका टीव्हीसमोर किमान तीस-चाळीस प्रेक्षक. राम-सीता विवाहाचा एपिसोड येणार म्हणून कित्येकांनी पताका लावल्या, लग्न लागल्यावर फटाके वाजवले. कित्येक लग्ने जमलीत या सीरियलच्या दरम्यान. आमच्या सुनीलचं लग्न आठवतंय. लग्नसराईत, रविवार सकाळचा मुहूर्त मिळाला तर तो टाळला जाई पण सुनीलला रविवारी सकाळी पावणेअकराचा चांगला मुहूर्त मिळाला. त्याने तोच फायनल केला. सुनील बिनधास्त होता.. त्याचे फंडा क्लियर होते. सरळ 'ब्राह्मण सहायक संघ' गाठलं. एरवी इथलं बुकिंग मिळणं नामुमकिन! तिथल्या क्लार्कनं त्याला वेड्यात काढलं..'साहेब, या तारखेचा मुहूर्त चांगला आहे.. रविवार आहे.. दोन्ही हॉल आहेत.. पण येणार कोण? त्या वेळात रामायण असतं ठाऊक आहे ना?'.. 'तुम्ही टेन्शन घेऊ नका साहेब.. दोन्ही हॉल बुक करा.. ताबडतोब!' क्लार्कनं आपलं काम केलं आणि मिशीत हसला. सुनीलनं मुली कडच्यांना समजावलं. भटजींना पटवलं. पत्रिकांचं वाटप सुरू झालं. सुनीलचं लग्न

शेकडो लोकांच्या उपस्थितीत थाटामाटात पार पडलं. त्याने काय केलं होतं ठाऊकेय? सगळी तरतूद आधीच करून ठेवली होती. आम्ही मित्र पहाटेच हॉलवर पोहोचलो होतो. डेकोरेशनवाल्यानं स्टेज रात्रीच सजवलेला. केटरींगवाले लेलेकाका त्यांचा लवजमा घेऊन नाश्ता बनवण्यात मसरूफ होते, तर इन-डोअर ॲन्टेना लाऊन टीव्ही ट्यून करण्यात आम्ही मश्गुल होतो. दोन टीव्ही खास भाड्याने आणलेले. आप्त-स्वकीय, नातेवाईक, मित्रमंडळी सात-साडेसातपासूनच येऊ लागली. कारण सुनीलने पत्रिकेत ठळक अक्षरात लिहिलं होतं.. 'आपण कृपया सहकुटुंब, सहपरिवार, मित्रमंडळींसह हॉलवर सकाळी ७ वाजता पोहोचावे. आपल्यासाठी दूरदर्शनच्या संचासह चहा, नाश्ता इ. सर्व सोय केलेली आहे. कार्य सिध्दिस नेण्यास....' तयारी जय्यत होती. लाऊड-स्पीकरवर 'बिस्मिल्ला खॉं साहेबांची शहनाई' वाजत होती. मैफिलीला बसतात तशी मंडळी आब राखून स्थानापन्न होत होती. नाश्ता खात होती. टीव्हीवर जे काही सुरु होतं ते चवीनं पाहत होती. धावपळ, गडबड, गोंधळ काही नाही. आता सर्वांना इंतजार होता रामायणच्या एपिसोडचा! मान गये उस्ताद! सर्वांनी तो एपिसोड मन लावून पाहिला. 'रामायण' पाहून होताच.. लगबग सुरू झाली. टिपिकल लग्नासारखी! अरे वाजवा रे वाजवा...! (अधिकचं सांगायचं तर, २००८ साली 'रामायण' ही 'मालिका' नव्याने 'रीबुट' करून 'एन.डी.टी.व्ही'वर सादर केली गेली! कलावंत वेगळे होते. त्यातील गाण्यांची 'ऑडिओ सी.डी.' सुद्धा प्रकाशित झाली होती. 'लिंक पहा'!)

टीव्हीवर चांगल्या मालिकांचा ओघ सुरूच होता! मात्र याच दरम्यान 'व्हीसीआर' आले. सिनेमा, 'व्हिडिओ टेप्सवर' पहायची फॅशन आली! लोक 'व्हीसीआर' भाड्याने आणून एका रात्रीत तीन- तीन पिक्चर्स पाहू लागले. दुदैवाने यामुळे झालं असं, की 'ऑडिओ-कॅसेट'च्या जमान्यात डोकं वर काढू पाहणारे, तसेच अमुक 'अधिकृत' कंपन्यांची 'गाणी' बिनधास्त व गैरप्रकारे 'कॅसेटस्' वर रेकॉर्ड करून कमाई करण्याचं 'चौर्यकर्म' करणारे महाभाग, आणखी धीट झाले! (असं ऐकलंय की दुबईतल्या कुठल्याशा..'थॉमसन इलेक्ट्रॉनिक्स' तसेच काही इतर कंपन्यांच्या 'कॅसेटस्' इथे बिनधास्त व उजळमाथ्याने विकल्या जात!) नंतर तर त्यांची हिम्मत वाढली! 'चित्रपट' प्रदर्शित होतो न होतो तोच, संपूर्ण 'चित्रपट' बिनधास्त अमुक 'व्हिडिओ कॅसेटवर' ते 'उपलब्ध' करून देऊ लागले. हे मी 'लॅमिंग्टन रोडवर' (अगदी त्या 'पोलिस-स्टेशन'च्या समोरच्या फुटपाथवर) स्वतःच्या डोळयांनी पाहिलंय! तर याच काळात संगीत आणि एकंदर चित्रपट उद्योगाला पायरसीने पोखरायला सुरूवात केली. मित्रांनो, या 'पायरसी' नामक, एका भयंकर गोष्टीने त्या काळी आमच्या 'म्युझिक व फिल्म इंडस्ट्रीला', वाळवी पेक्षाही खतरनाक प्रकारे पोखरलं होतं! (यात काही बडी धेंडं सुद्धा सामिल होती, असं म्हणतात!) आपल्या आयुष्यात अथक व जी-तोड मेहनत करून आपली 'पुंजी' पणाला लावलेले ते कलासक्त निर्माते/ दिग्दर्शक/ कलावंत/ तंत्रज्ञ लोक चिडून म्हणायचे 'क्यूं करू मैं यह सब!? किस के लिए! उन xxx के लिए?

मेहनत करे मुर्गा, अंडा खाए फकीर?.. नही यार!' एकदा या 'पायरसी' विरूद्ध आपला आवाज बुलंद करण्यासाठी अवघी 'फिल्म-म्युझिक इंडस्ट्री' मुंबईच्या रस्त्यावर उतरली होती! यानंतर काही 'कायदे-कानून' करून ते रोखण्याचा प्रयत्न झाला खरा! पण लागलेली 'वाळवी' पूर्णतः कधीच नष्ट होत नाही, हे त्रिकालाबाधित सत्य आहे! आजही ती 'बिमारी' पूर्णतः नष्ट झालेली नाही! याचं वाईट वाटतं!

'रामायण'चा कैफ ताजा असतानाच बी.आर चोप्रांची 'महाभारत' (१९८७-८९) ही मालिका सुरू झाली. या महामालिकेच्या दरम्यान बऱ्याच जणांनी नवे रंगीत टीव्ही संच घेतले. टीव्हीचं प्रस्थ वाढत गेलं. तो घराघरात आला आणि एक दिवस त्याने रेडिओच्या दिवाणखान्यातल्या हक्काच्या जागेवर निर्दयपणे कब्जा केला. महाभारत मालिकेचं सादरीकरण जबरदस्त होतं. रामायणात भावभावनांचा कल्लोळ, भक्ति, समर्पण होतं, मात्र इथे होतं जबरदस्त नाट्य! चोप्रा कॅम्पच्या लौकिकाला साजेशी पेशकश. चकाचक सेटस्, कलाकारांची योग्य निवड, खटकेबाज संवाद.. बस्स! अगदी पहिल्याच एपिसोड नंतर 'महाभारत' मालिकेला सर्वांनी आपलंसं केलं. यानंतर तर लोक टीव्हीच्या भजनीच लागले. आईला माताश्री, वडिलांना पिताश्री म्हणण्याचा पायंडा पडला!

लक्षात घ्या, या क्षणापर्यंत टीव्हीचं प्रसारण (प्रसार-भारती) हे सरकारच्या अखत्यारीत होतं. काय दाखववावं यावर बंधनं होती, निर्बंध होते, जणू सेन्सॉर होतं. मात्र १९९१च्या सुमारास जागतिकीकरणावे वारे वाहू लागले, आणि थेट

‘दूरदर्शन’ला त्याची झळ बसली. कलाक्षेत्राला अर्थकारणाने घेरलं. जो कार्यक्रम अर्ध्या तासात नेटकेपणे सादर होत होता, त्यातला बराच वेळ आता जाहिरातींवर खर्च होऊ लागला. नंतर पंतप्रधान नरसिंह राव यांच्या कारकिर्दीत, खाजगी चॅनल्सना मान्यता देण्यात आली. बऱ्याच जणांनी मोकळा श्वास घेतला खरा पण इथेच निखळ मनोरंजनाच्या मृत्युयोगाची सुरुवात झाली. स्टार, सीएनएन, झी, सन या उपग्रह वाहिन्या सुरु झाल्या. त्यावरच्या दैनंदिन मालिकांमध्ये प्रेक्षक गुंतून गेले. एकीकडे भले ‘सह्याद्री’ वाहिनी अभिरुचीसंपन्न कार्यक्रम सादर करण्यास धडपडत होती, परंतु खाजगी वाहिन्यांनी त्यांच्या मनसुब्याला सुरुंग लावला. ‘भाकरी का करपली, घोडा का अडला!..’ या चालीत ‘दूरदर्शन’ पासून प्रेक्षक दूर का गेले? याचं उत्तरही काहीसे अस्सेच आहे! ‘मुंबई दूरदर्शन’ आणि ‘सह्याद्री’ वाहिनीला खाजगी इतर मनोरंजन आणि नव्या वृत्तवाहिन्यांची तगडी स्पर्धा निर्माण झाली. आपल्या सादरीकरणात काळानुरूप बदल न केल्यानेच प्रेक्षक ‘मुंबई दूरदर्शन’ आणि ‘सह्याद्री’ वाहिनीपासून दूर दूर जाऊ लागले. त्यांना भले त्या वाहिन्या, आधी आवडत असल्या तरी आता स्पर्धा निर्माण झाली होती. ‘दूरदर्शन’ सरकारच्या अखत्यारीत असल्याने ‘दूरदर्शन’शी संबंधित वाहिन्या एका विशिष्ट चौकटीतच राहूनच कार्यक्रम सादर करत असतात हे ध्यानात येताच नंतर लोकांनी चक्क पाठ फिरवली. स्टार-प्लस, बीबीसी, एम टीव्ही, प्राईम-स्पोर्टस्, स्टार-चायनीज अशी पाच  चॅनल्स तर ‘झी टीव्ही’ ही भारताची स्वदेशी वाहिनी येताच

केबल-ऑपरेटर हा नवा व्यवसाय उदयास आला. जाहिरातीतून खोऱ्यानं पैसा ओढता येतो हे कळताच एकेक चॅनल येत राहिलं! (आज टीव्हीकडे नुसतं पाहिलं तर, पहिली हिन्दी सिरियल 'हम लोग' (१९८४) ते 'गुम है किसी के प्यार में' (२०२०) तसेच मराठीत 'चिमणराव गुंड्याभाऊ' (१९७७) ते पुढे 'अवंतिका' (२००२) आणि आजच्या 'तू भेटशी नव्याने' (२०२४) या मालिकांचा थक्क करणारा प्रवास दृष्टीपथात येतो.) १९९१-९२ पासून येणाऱ्या सर्वच मालिकांचं लोकांनी स्वागतच केलं. परंतु प्रायोजक, जाहिराती मिळवण्याच्या हव्यासापोटी ज्या दिवशी वेगवेगळे चॅनल्स शड्डू ठोकून स्पर्धेत उतरले आणि 'टीआरपी'साठी वाटेल ते करायला लागले ना!.. त्या क्षणापासून टीव्हीवरच्या निखळ मनोरंजनाला कीड लागली. धडाधड मालिका येत होत्या. लोकांना आता त्याचं व्यसनच जडलं होतं. जुन्या - नव्या त्या मालिका! 'सोनी-टीव्ही' वर काही गाजलेल्या सिरियल्स 'मेरे साई', 'कृष्ण', 'गणेश', 'जय हनुमान', 'कुंडली भाग्य', 'नागिन', 'सी.आय.डी', 'कौन बनेगा करोडपती'!.. कौंटुंबिक मालिका हा तर त्यांचा जिव्हाळ्याचा विषय! महिला त्यांचं टार्गेट. झालं!.. या मालिका सुपरहिट ठरल्या. पण त्या मालिकांमुळे सुखी कुटुंबात कलह निर्माण झाले. 'क्यों की सास..' बद्दल सांगायचं तर ३ जुलै, २००० साली सुरू झालेली ही मालिका ६ नोव्हेंबर, २००८ पर्यंत सुरूच होती. सुमारे आठ वर्षे! ओ माय गॉड! (इच्छुकांनी ही 'लिंक' पहा!) शेवटी 'टीआरपी' मिळत नाही म्हणून ती बंद झाल्याची बातमी आली. नंदूदादा

केवढा सुखावलाय म्हणून  सांगू?.. त्यानं ट्रेनमधल्या दोस्तांना, शेजारच्या मित्रांना चक्क जंगी पार्टी दिली. पार्टीत तो तुडुंब प्याला.. रोंबा-सोंबा नाचला आणि नंतर रड-रड-रडला..कारण!? त्याला ठाऊक होतं.. आपला हा आनंद वांझोटा  आहे! आपण आयुष्यभर खूप कमावलं.. पण आता आयुष्याच्या संध्याकाळी आपल्या सोबत मुलंबाळं वगैरे कुणीच जवळ नाहीय. आपण आपलं कुटुंब गमावलंय.. कायमचं.!! 'कोण होतास तू, काय झालास तू?!' तर.. या आठवणी 'दूरदर्शन' च्या!

**© - डॉ. अनंत पावसकर** (ज्येष्ठ पत्रकार, लेखक व संगीत संयोजक)
anantpavaskar@gmail.com      **(9820022417)**

♥




Watch all your
'FAVORITE SHOWS'
(Just click on Photos..)
Your Own
HOME THEATRE


YOUR FAVORITE
TV SERIALS


विक्रम और बेताल


नुक्कड़
NUKKAD
DIRECTED BY KUNDAN SHAH, SUDHIR MISHRA, MANJUL SINHA, AZIZ MIRZA


R. K. NARAYAN'S
Malgudi
Days


YEH JO HAI
ZinDagi
ये जो है ज़िंदगी
With Best Compliments


R. K. Narayan's
MALGUDI
Malgudi Days


DEKH BHAI DEKH


BLOCKBUSTER SERIAL
KARAMCHAND


KARAMCHAND


HUM PAANCH


NATIONAL
मुंगेरीलाल
के हसीन सपने
139 EPISODES


83 EPISODES
Zabaan Sambhalke


Jaspal Bhatti's
Flop Show


छाया गीत


फूल खिले हैं
गुलशन गुलशन


In Hindi
रामानंद सागर कृत
सम्पूर्ण
रामायण
SAMPOORN
Ramayan
117
EPISODES


चित्रहार


SHAH RUKH KHAN
IN
FAUJI
(A TV SERIAL IN HINDI)


139
EPISODES
महाभारत
MAHABHARAT


49 EPISODES
dial
100


CIRCUS


14 EPISODES
"KACHCHI DHOOP"


54 VIDEOS
KHICHDI


रंगोली
Bollywood songs with philosophy of life


Season 3
खिचड़ी
36 VIDEOS


NATIONAL
CHUNAUTI


Serial By B. P. SINGH
SONY
आहट
200 EPISODES


Wagle Ki Duniya
Nayi Peedhi Naye Kissey
SONY SAB
987 EPISODES


Sarabhai V/S Sarabhai
STAR one
1 November 2004 to 16 April 2006
81 EPISODES


CID
SONY
630 EPISODES
Season 01


1000
EPISODES
SONY
SAB
Taarak Mehta
ka OOLTAH
CHASHMAH


Season 01
SONY
CRIME
PATROL
475 EPISODES


CID
SONY
1000 EPISODES


SONY
CRIME
PATROL
सतर्क
SEASON - 2
1784 EPISODES


SONY
CRIME
PATROL
DIAL 100
1292 EPISODES


SONY
The
KAPIL SHARMA
show
246
VIDEOS


SONY
The
KAPIL SHARMA
show
144
VIDEOS


Producer / Director
ASHOK PANDIT
(182 EPISODES)
फिल्मी चक्कर
ZEETV


SONY
CRIME PATROL
SATARK
771 EPISODES


SHRIMAAN
SHRIMATI


SONY
The KAPIL SHARMA show
129
VIDEOS


CID
SONY
1098 EPISODES


THE ZEE
HORROR
SHOW
Presented By
RAMSAY BROTHERS
ZEETV
(168 EPISODES)


NATIONAL
कुमकुम भाग्य


HUM LOG


Ekta Kapoor's
KASAMH SE
Teen behano ka vaada zindagi se
739 EPISODES


Ekta Kapoor PRESENTS
कितनी मुहब्बत है
Romantic Drama
(19 January, 2009)
168 EPISODES


Ekta Kapoor PRESENTS
THESE ARE 90 EPISODES
StarPlus
Kyunki...
Saas bhi
kabhi bahu thi...
3 July 2000 to 6 November 2008 (1833 EPISODES)


Kabhii Sautan
Kabhii Sahelii
EKTA KAPOOR
Presents
StarPlus
212 EPISODES
CREDIT -
BALAJI TELEFILMS


बड़े
अच्छे
लगते हैं
NATIONAL


पुनर्विवाह


INDIA'S BIGGEST
BLOCKBUSTER SERIAL
Directed by Ramesh Sippy
BUNiYAAD
DD NATIONAL
Just Click and WATCH


SONY
SAB
F.I.R.
856 EPISODES


Kahaani


(1000 EPISODES)
COMEDY NIGHTS
KAPIL
colors


Kkusum
614 EPISODES


SONY
SAB
OFFICE OFFICE
(73 EPISODES)


BALAJI TELEFILMS
Ekta Kapoor PRESENTS
StarPlus
पवित्र रिश्ता
1 June 2009 to 25 December 2016 (3063 EPISODES)


1673 VIDEOS
balika Vadhu


कथा
अनकही...


Pyaar kii ye ek Kahaani


आम्ही
मराठी
आवडीच्या विविध मालिका


49
Videos
सह्याद्री
गोट्या
अतिशय छान 'मराठी मालिका'


मराठी
कुंकू
564
EPISODES


चिमणराव
गुंड्याभाऊ
सह्याद्री
दूरदर्शन मालिका :
'चिमणराव-गुंड्याभाऊ' (१९७८)
लेखक : चिं. वि. जोशी,
व. पु. काळे, श्रीधर पैसास इ.
दिग्दर्शक : विजया जोगळेकर-धुमाळे
प्रमुख कलावंत :
दिलीप प्रभावळकर, बाळ कर्वे
16
Videos


32
Videos
सह्याद्री
गोट्या
अतिशय छान 'मराठी मालिका'


मराठी
(26 EPISODES)
फू बाई फू
2010 to 2014 (Total 9 Seasons)


मराठी
लोकप्रिय मराठी मालिका
99 EPISODES
दे धमाल
(2001)


(116 EPISODES)
फू बाई फू
नया है यह
2010 to 2014 (Total 9 Seasons)

डायल
एक शून्य शून्य

शाब्बास सूनबाई!
219 EPISODES

होणार सून मी ह्या घरची
805 EPISODES

49 Videos
सह्याद्री
गजरा

159 EPISODES
श्रीयुत गंगाधर टिपरे
ZEE5

वादळवाट
90 VIDEOS

या सुखांनो या
(150 EPISODES)


ZEE मराठी
(745 EPISODES)
असंभव
लेखक : चिन्मय मांडलेकर
दिग्दर्शक : सतिश राजवाडे
कलावंत : उमेश कामत, उर्मिला कोठारे
ZEE5


सह्याद्री
'श्वेतांबरा'
दिग्दर्शिका : मीना वैष्णवी


सह्याद्री
भाग १ ते ५
स्वामी
दिग्दर्शक : गजानन जागिरदार


colors मराठी
स्वामिनी
307 EPISODES


महाराष्ट्राची
लोकधारा
संकल्पना : शाहीर साबळे
संगीत : देवदत्त साबळे


मराठी
416 Videos
चला हवा येऊ द्या


आभाळमाया
मराठी
191 VIDEOS


SONY मराठी
महाराष्ट्राची हास्य जत्रा
486 EPISODES


SONY
मराठी
महाराष्ट्राची
हास्य जत्रा
लेखक : सचिन मोटे
दिग्दर्शक : सचिन गोस्वामी
526 EPISODES


मराठी
होम मिनिस्टर
3022 EPISODES


SONY
मराठी
महाराष्ट्राची
हास्य जत्रा
दे धक्का 2
SPECIAL
SPECIAL PLAYLIST


ZEE मराठी
28 EPISODES
मालवणी डेज


(93 EPISODES)
मराठी
हप्ता बंद


colors
कॉमेडीची
बुलेट ट्रेन


SONY
मराठी
लेखक : सचिन मोटे
दिग्दर्शक : सचिन गोस्वामी
बोनस
डबल धमाका
महाराष्ट्राची
हास्य जत्रा
627 EPISODES


ZEE मराठी
रात्रीस खेळ चाले 2
Season 02
415 EPISODES


ZEE मराठी
114 EPISODES
तुफान विनोदी मालिका
गाव गाता गजाली


ZEE मराठी
काही गोष्टी रात्रीच दिसतात!
रात्रीस खेळ चाले 1
Season 01
205 EPISODES


ZEE मराठी
294 EPISODES
तुला पाहते रे


रात्रीस खेळ चाले
3


Kids TV Shows


Just 'Click'
TOM and JERRY


TOM and JERRY
MOVIES


TOM and JERRY
EPISODES PLAYLIST


10 Hours
Non-Stop
Walt Disney's
DONALD DUCK
AND FRIENDS


Walt Disney's
DONALD DUCK


DISNEY
3 Hours
Non-Stop
Walt Disney


7 Hours Non-Stop
CHIP 'N DALE
DONALD DUCK


7 Hours Non-Stop
CHIP 'N DALE
DONALD DUCK


46 VIDEOS
CHARLIE
CHAPLIN
Silent Genius, Timeless Laughter


BEST OF
CHARLIE
CHAPLIN


DONALD DUCK
150 Minutes Non-Stop
Walt Disney


charlie CHAPLIN
SUPER HIT FILMS


LAUREL & HARDY
SUPER HIT SHOWS
81 VIDEOS


160 VIDEOS
LAUREL & HARDY


The Best of Laurel & Hardy
36 VIDEOS


73 VIDEOS
Stan Oliver
LAUREL & HARDY


156 EPISODES
POPEYE
Kid's Favorite


THE JUNGLE BOOK
POWER KIDS
52 EPISODES


The Jungle Book
जंगल के राजा
मोगली की कहाँनिया
97 EPISODESS
Subscribe us at www.powerkidstv.com


ROWAN ATKINSON's
Mr.Bean
(1990 TO 1995)
itv
(Non-Stop 5 Hrs.)


Our Favorite
SHAKTIMAAN


itv
(82 EPISODES)
ROWAN ATKINSON's
Mr.Bean
(1990 TO 1995)


The Jungle Book
मोगली की
कहानी
127 EPISODES
Subscribe us at www.powerkidstv.com


CN
CARTOON NETWORK
(2111 EPISODES)
Mr
Bean


(1990 TO 1995)
itv
ROWAN ATKINSON's
Mr.Bean
(520 EPISODES)


ROWAN ATKINSON's
Mr.Bean
itv
(1990 TO 1995)
(276 MOVIES)


CARTOON NETWORK
mr Bean
(459 EPISODES)


KUNG FU PANDA
(6th JUNE, 2008 onwards)
(133 VIDEOS)


peacock
KUNG FU PANDA
(6th JUNE, 2008 onwards)
(166 VIDEOS)


KUNG FU PANDA
(6th JUNE, 2008 onwards)
(169 VIDEOS)


Pogo
(626 EPISODES)
CHHOTA BHEEM


Disney CHANNEL
DORAEMON
(36 VIDEOS)


Disney CHANNEL
POKéMON
(201 EPISODES)


(1047 EPISODES)
SONY
विघ्नहर्ता गणेश
(August 2017 to November 2021)


DISNEY CHANNEL
DORAEMON
(80 VIDEOS)


KIDS AND FOR FAMILY SPECIAL
MY FRIEND GANESHA
(ALL MOVIES PLALIST)


FULL MOVIE
THE JUNGLE BOOK


HD
Little Hero
फुल मूवी | इन हिंदी


ENGLISH
SUPER 7


3D
Little Superman


HINDI
VEER ABHIMANYU


THE STOLEN PRINCESS
4K

Whatsapp: 9987737237 esahity@gmail.com

‘डॉ. अनंत पावसकर’ यांची प्रकाशित झालेली ‘ई-बुक्स’.. ‘क्लिक’ करा..

**For all ‘E-Sahitya’ E-Books.. Visit/Log on https://www.esahity.com**

























